आवृत्ती – अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १३२ । सोमवार २३ फेब्रुवारी २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## तुमच्या भावनांची कोणाला पडलीये...




भारतीय महिला क्रिकेट संघाची स्टार फलंदाज स्मृती मानधना पुन्हा एकदा भावूक झाली. मात्र यावेळी कारण वैयक्तिक आयुष्य नाही, तर खेळाविषयीची तिची निष्ठा आणि जिद्द होती. स्मृतीने आपल्या नोटमध्ये लिहिले की, 'खेळ तुमच्या भावनांची कोणाला काही पडलेली नाही, हे एक कडू सत्य आहे. तुम्ही थकलेले असाल, नुकतेच जिंकलात किंवा पराभूत झालात, तुम्ही सर्वोत्तम खेळाडू असाल किंवा नवखे... यापैकी कोणत्याही गोष्टीला फारसा अर्थ नाही. तुम्ही किती आत्मविश्वासात आहात किंवा किती घाबरलेले आहात, किती मेहनत घेतली आहे... यापेक्षा महत्त्वाचं एकच आहे... तुम्ही त्या दिवशी खेळ कसा खेळता. तुमच्यात त्या दिवशी सर्वोत्तम देण्याचा हेतू असला पाहिजे. जर तुम्ही तुमची पूर्ण ताकद, लक्ष आणि खेळाविषयी आदर दिलात, तर यशाची शक्यता नक्कीच वाढते. आणि मग पुन्हा एकदा तेच करण्याची संधी मिळते, हाच खेळाचा सर्वात सुंदर भाग आहे.' ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-२० मालिकेत स्मृती मानधना हिने अप्रतिम फलंदाजी केली. तिने तीन सामन्यांत ६४.५० च्या सरासरीने आणि १३४.३८ च्या स्ट्राइक रेटने एकूण १२९ धावा केल्या. मालिकेत सर्वाधिक धावा करणारी फलंदाज ठरत तिने 'प्लेअर ऑफ द सीरिज' हा मान पटकावला.

## महत्त्वाचे..

### नरहरी झिरवाळांना मुख्यमंत्र्यांकडून क्लीन चिट



**मुंबई :** अन्न आणि औषध प्रशासन खात्यातील लाचखोरी प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी मंत्री नरहरी झिरवाळ यांना क्लीन चिट दिली आहे. लाचखोरी प्रकरणात मंत्र्यांच्या विरोधात कोणताही पुरावा नाही.पुरावे असल्यास एसीबी कारवाई करते असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. अन्न आणि औषध प्रशासनातील कर्मचारी राजू ढेरिंगे याला लाच घेताना लाचलुचपत विभागाने रंगेहात पकडलं होतं. त्यावरून नरहरी झिरवाळ अडचणीत आले आहेत. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मी अँटी करप्शन ब्युरोला पूर्णपणे स्वातंत्र्य दिलं आहे. उद्या माझाही कार्यालयात असा कोणी व्यवहार केला तर देखील त्याच्यावर देखील कारवाई होईल. मंत्र्याच्या विरोधात पुरावा असता तर कारवाई झाली असती. कोणतीही कारवाई करण्याआधी एसीबी आधी माहिती घेते. त्यावेळचं संभाषणदेखील रेकॉर्ड केलं जातं, त्याच्या नोंदी घेतल्या जातात. आतापर्यंत समोर आलेल्या गोष्टींमधून मंत्र्यांचं कुठेही नाव आलेलं नाही.

## हवेत गोळीबार नको; शंका मांडा, उत्तर देऊ

## मुख्यमंत्र्यांचे विरोधकांना आवाहन :

# आजपासून अर्थसंकल्पीय अधिवेशन



**मुंबई :** विरोधकांनी नुसते हवेत गोळीबार करणे आणि पळून जाणं हे योग्य नाही. विरोधकांनी अधिवेशनात त्यांच्या मनात शंका असलेले सगळे प्रश्न मांडावेत, त्याला सविस्तर उत्तर आम्ही देऊ. विरोधी पक्षांना भरपूर चर्चेची संधी देऊ असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. तर अजितदादांनी जे स्वप्न पाहिलं होतं ते पूर्ण करण्यासाठी काम करू असे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या. तर निवडणुकीच्या वेळी ज्या घोषणा करण्यात आल्या होत्या त्या पूर्ण करण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

आज सोमवारपासून अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात होत आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला पत्रकार परिषदेत महायुती सरकारकडून अजितदादांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. अजितदादांनी आर्थिक शिस्त कधीही मोडली नाही, त्यांचे कार्य पुढे नेऊ असा विश्वास यावेळी देवेंद्र फडणवीसांनी व्यक्त केला. या अधिवेशनाच्या माध्यमातून गोरगरिबांच्या प्रश्नांची सोडवणूक आम्ही करू. देशातील सर्वाधिक दिवस अधिवेशन हे महाराष्ट्रात होतं. अजित पवारांनी या अर्थसंकल्पाची चांगली तयारी केली होती. पण दुर्दैवाने ते आपल्यात नाहीत. कुठल्याही मुख्यमंत्र्यांना निर्धास्तपणे अर्थखातं ज्या व्यक्तीला देता येईल असं व्यक्तिमत्व अजितदादा होते. अर्थखात्याची शिस्त ते पाळायचे आणि कुठलाही बेशिस्तपणा ते चालू द्यायचे नाहीत. आर्थिक शिस्तीत बसत नसेल तर ते स्पष्टपणे सांगायचे. पण जिथे आवश्यक असेल तिथे मार्गदेखील काढायचे. सुनेत्रा पवार या पहिल्यांदाच अधिवेशनाला सामोरं जात आहेत. अनेक वर्षांचा त्यांचा अनुभव आहे. दादांप्रमाणे त्या ठामपणे या अधिवेशनाला सामोरं जातील असा विश्वास आहे.

केंद्राकडून महाराष्ट्राला मिळणाऱ्या निधीमध्ये २० हजार कोटींची वाढ झाली आहे. तर महाराष्ट्राला ९८,३०० कोटी रुपयांचा कर परतावा मिळणार आहे. दावोसमध्ये ३० लाख कोटींचे करार करण्यात आले. त्याची काय वस्तुस्थिती आहे याचे सविस्तर विवेंचन या अर्थसंकल्पात करण्यात येणार आहे. महाविस्तार या नावाचं एक एआय ॲप तयार करण्यात आलं असून प्रत्येक शेतकऱ्याला त्याचा फायदा होणार आहे. पिकाचा फोटो काढला तरी ते ॲप शेतकऱ्याला त्याच्या पिकाची अवस्था काय आहे याची माहिती मिळणार आहे.

विरोधकांचं एक सहा पानाचं आणि १८ मुद्द्यांचं पत्र आम्हाला मिळालं. जागतिक मातृभाषा दिनी आपल्या मातृभाषेच्या एवढ्या चुका या पत्रात करण्यात आल्या आहेत. बातम्यामध्ये आलेले पॅरा आहे तसे यामध्ये टाकण्यात आले आहेत, जराही बदल करण्याची तसदी त्यांनी घेतली नाही. यंदाचे अधिवेशन हे महायुती सरकारचं दुसरं अर्थसंकल्पीय अधिवेशन आहे. महायुतीला लोकांनी सत्ता दिली, त्या विश्वासाला न्याय देण्याचं काम आमचं सरकार करेल. दिवंगत अजितदादांनी ११ वेळा **(पान ४ वर)**

### अजितदादांचे स्वप्न पूर्ण करायचे आहे



**अर्थसंकल्प मांडायचा म्हटल्यावर सर्वांचं लक्ष अजितदादांकडे लागलेलं असायचं. आज ते आपल्यामध्ये नाहीत. त्यांच्या दुःखाचं सावट या अर्थसंकल्पावर आहे. नियतीसमोर आपलं काही चालत नाही. विकासाची घडी कशी बसवायची आणि मंत्रिमंडळाच्या बैठकीत देखील आपल्या सहकाऱ्यांना आर्थिक बाबींबद्दल अजितदादा स्पष्टपणे सांगायचे. त्यांचे स्वप्न आता आपल्याला पूर्ण करायचं आहे. देवेंद्र फडणवीसांना राज्याच्या अर्थव्यवस्थेची नाडी माहिती आहे. सर्वसामान्याचं सरकार म्हणून साडेतीन वर्षे आम्ही काम केलं. या काळात अनेक योजना आम्ही सुरू केल्या. दावोसमध्ये ३० लाख कोटींचे करार केले. त्या माध्यमातून ४० ते ५० लाख लोकांना रोजगार मिळणार असून राज्य प्रगतीपथावर जाण्यास मदत होईल. निवडणुकीच्या वेळी ज्या ज्या घोषणा आम्ही केल्या त्या घोषणा योग्य वेळी पूर्ण करू. – एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री**

# तरुणांना ड्रग्स अन् विरोधकांना चहा..?

## चहापानावर विरोधकांचा बहिष्कार : भास्कर जाधव



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** सत्ताधाऱ्यांच्या चहापानावर आम्ही बहिष्कार टाकत आहोत. ऋप्रचंड बहुमत मिळाल्यामुळे सरकार मस्तीत आहे, त्यांना त्याचा माज आहे. मुख्यमंत्र्यांच्या आमंत्रणाला आम्ही जाणार नाही, विरोधकांचा चहापानावर बहिष्कार अशी प्रथा पडलीय असं काहींना वाटेल. मात्र तसे नाही. सत्ताधाऱ्यांकडून लोकशाहीचं आणि संविधानाला अनुसरून हवी तशी वागणूक मिळत नाही. खरं तर आम्ही सत्ताधाऱ्यांच्या चहा प्यायला जात नसतो तर सरकारी तिजोरीतील पैशातून चहा प्यायला जात असतो. लोकशाही मार्गाने हे सत्ताधारी आणि विरोधी पक्ष हे अंग आहे. मात्र बहुमत मोठे असल्याने सत्ताधारी विरोधकांचा नियमित तापमान करतात, म्हणून आम्ही चहा पानावर बहिष्कार टाकल्याचे जाधव म्हणाले. तर राज्यात नशीखोरी वाढत आहे तरुणांना ड्रग्स दिले जात असताना आम्ही सरकारचा चहा कसा प्यायचा? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

शिवलाय येथे महाविकास आघाडीची पत्रकार परिषद पार पडली. विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर ही बैठक घेण्यात आली. या बैठकीला काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, सतेज पाटील, शिवसेनेचे नेते आदित्य ठाकरे, भास्कर जाधव, अनिल परब, आणि अमिन पटेल उपस्थित होते. मात्र या बैठकीला शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून एकही नेता उपस्थित राहिलेले नाही. त्यामुळे शरद पवारांचा पक्ष महाविकास आघाडीपासून दूर आहे का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

भास्कर जाधव म्हणाले, आमच्या चहापाण्यावरचा बहिष्काराचं दुसरं कारण म्हणाले, आपले कणखर उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा घात आहे की अपघात आहे, हे अद्याप कळू शकलेलं नाही. ऋत्यामुळे आम्ही चहापानाला जात नाही आहे. ऋपिकविमा बंद करण्यात आला आहे. राज्यात ऋउडता पंजाब सारखी परिस्थिती झाली आहे. ऋएका मंत्र्याच्या गावात ड्रग्ज सापडलेत. ऋएकीकडे आम्हाला चहा पाजायचा आणि दुसरीकडे तरुण पिढीला ड्रग्ज देतात म्हणुन **(पान ४ वर)**

### शेतकऱ्यांची लूट

**शेतकऱ्यांची लूट चालली असून सोयाबीनला ४ हजार रुपयांपलीकडे एक रुपया मिळाला नाही. मका १५००-१६०० रुपयाच्या पलीकडे व्यापाऱ्यांनी घेतला नाही महाराष्ट्रातील एका शेतकऱ्याला सावकारांच्या कर्जामुळं त्याला किडनी विकावी लागते, तो आमच्या चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकरी आहे. ९ लाख ३२ हजार कोटी रुपयाचं कर्ज राज्याच्या डोक्यावर आहे, लाडक्या बहिणींमुळे हे राज्य कर्जबाजारी होते असं सांगतात. लाडक्या बहिणीच्या नावाने देताय दीड (हजार) आणि कर्जबाजारी झालय म्हणून तुमचे मंत्री सांगतात, हे सगळं जे ढोंग आहे.**

**– विजय वडेट्टीवार**

### १ लाख ५७ हजार महिला मुली बेपत्ता

**कमिशनखोरी महाराष्ट्रामध्ये सरळ सरळ २०-२५ टक्क्यांवर जात असेल, टेंडरची किंमत दीडपट वाढवून पुन्हा ते टेंडर प्रकाशित होऊन एका विशिष्ट माणसाला दिलं जातं. महाराष्ट्रामध्ये बोली लागलेली आहे, तू १५ टक्के देतो काय? चल २२ टक्के फायनल तुला काम मिळालं, अशी स्थिती झाली. आज महाराष्ट्रामध्ये अशा १ लाख ५७ हजार महिला आणि मुली लापता आहेत, कुठे आहे महाराष्ट्र? अशी विचारणा विरोधी पक्षांनी केली.**

## चारित्र्यसंपन्नतेचा 'अभिषेक' करावा..!

**भारतीय समाजव्यवस्थेत चारित्र्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्राचीन काळापासूनच नेते आणि राजे हे समाजासाठी आदर्श असतात. महात्मा गांधी म्हणतात की, चारित्र्य हे सर्वश्रेष्ठ गुण आहे. पण आजच्या राजकारणात नैतिकतेचा ऱ्हास दिसून येत आहे. महाराष्ट्रात अलीकडच्या काळात अनेक राजकीय नेत्यांच्या व्याभीचाराच्या प्रकरणांनी समाजात खळबळ उडवली आहे. ही प्रकरणे केवळ वैयक्तिक नाहीत, तर ते समाजाच्या नैतिक मूल्यांना आव्हान देतात. अहिल्यानगरचे माजी महापौर आणि शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर यांच्यावर एका तरुणीने नोकरीचे आमिष दाखवून अत्याचार केल्याचा आरोप केला. केवळ आरोप नाही तर त्या संदर्भात परिसर गुन्हा दाखल करून पोलिसांना काही व्हिडिओ पुरावे देखील त्या तरुणीने दिले. समाजाला दिशा देण्याची जबाबदारी असणारे नेतेच चारित्र्यहीन असतील तर चारित्र्यसंपन्न समाज व्यवस्थेची अपेक्षा आपण कशी करू शकतो.**

### विशेष संपादकीय...

करण नवले

**इतिहासात अशी अनेक उदाहरणे आहेत. सन १९९४ मध्ये जळगाव सेक्स स्कँडल उघडकीस आले. यात स्थानिक राजकीय नेते, व्यावसायिक आणि अधिकाऱ्यांनी अनेक मुलींवर सामूहिक अत्याचार केले. या प्रकरणात १८ मुलींच्या तक्रारी आल्या आणि अनेक नेते अडकले. हे स्कँडल महाराष्ट्राच्या राजकारणातील काळा अध्याय आहे. यानंतर १९९७ मध्ये गोपीनाथ मुंडे यांच्या तमाशा नर्तकी बारखा पाटीलसोबतच्या संबंधांची चर्चा झाली. मुंडे यांनी हे आरोप फेटाळले, पण शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंनीही यावर तिखट टिप्पणी केली होती. राजकारण आणि नैतिकतेच्या सीमांचा भंग किती जुना आहे, हे यावरून सिद्ध होते. आता अलीकडच्या प्रकरणांकडे वळूया. २०२१ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि तत्कालीन मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर बलात्काराचा आरोप झाला. एका गायिकेने आरोप केला की, मुंडे यांनी २००६ पासून अनेकदा बलात्कार केला. मुंडे यांनी हे आरोप फेटाळले आणि सांगितले की, तक्रारदार महिलेच्या बहिणीसोबत त्यांचे संबंध होते आणि त्यांना दोन मुले आहेत. संबंधित तरुणीची तक्रार म्हणजे ब्लॅकमेल असल्याचे ते म्हणाले. नंतर तक्रार मागे घेण्यात आली आणि तक्रारदार महिलेला ब्लॅकमेलिंगसाठी अटक झाली. राजकीय नेत्यांच्या वैयक्तिक जीवनातील गुंतागुंत कशी समाजात चर्चेचा विषय बनते आणि नैतिकतेची सीमा कशी धूसर होते, हे या प्रकरणाने पुढे आले.** **(पान २ वर...)**

## आदिवासी पाडा तिथे एसटी : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** सह्याद्री व मेळघाटच्या कुशीत, धुक्याने वेढलेल्या डोंगरदऱ्यांमध्ये, आजवर केवळ पायवाटांनीच ओलांडलेले अंतर आता 'लालपरी'च्या चाकांनी मोजले जाणार आहे! राज्यातील दुर्गम आदिवासी पाड्यापर्यंत एसटीची सेवा पोहोचवण्याचा ऐतिहासिक संकल्प परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी जाहीर केला. **(पान ४ वर)**

### 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी' मिडी बसेस, विकासाची नवी वाट

**राज्य परिवहन महामंडळ ९ मीटर लांबीच्या, ३५ आसनी अशा १०० अत्याधुनिक मिडी बसेस खरेदी करीत असून या बसेसना 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी' असे प्रेरणादायी नामकरण करण्यात येणार आहे. अरुंद रस्ते, तीव्र चढ-उतार आणि वळणावळणाच्या घाटरस्त्यांवरून सहज धावू शकतील, अशा या बसेस खास करून आदिवासी पाड्यांसाठीच नियोजित आहेत. ही केवळ बससेवा नाही, तर सामाजिक समावेशकतेचा सेतू आहे. शिक्षणासाठी शहरात जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी, आरोग्यसेवेसाठी धाव घेणाऱ्या मातांसाठी आणि रोजगाराच्या शोधात निघालेल्या तरुणांसाठी ही 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी' बस म्हणजे आशेचा किरण ठरणार आहे.**

### विकासाचा नवा संकल्प

**लालपरी'च्या चाकांमध्ये आता केवळ प्रवास नाही, तर परिवर्तनाची गती दडलेली आहे. डोंगर-दऱ्यांतील शांत पाड्यांवर लवकरच एसटीचा हॉर्न घुमेल आणि त्या आवाजात विकास, समता आणि संधींची नवी पहाट दडलेली असेल. असा विश्वास मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.**

## बदलापूर अंडाशय तस्करीचे आंतरराज्यीय रॅकेट

# ३०० हून अधिक महिला बळी

### एका अंडाशयामागे २० हजार रुपये; मुख्य आरोपीसह ३ महिलांना अटक



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** बदलापुरातील अंडाशय तस्करी प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. या प्रकरणात आंतरराज्यीय रॅकेट असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या अंडाशय तस्करी प्रकरणातील मुख्य आरोपी सुलक्षणा गाडेकरला पोलिसांनी अटक केली आहे. ही महिला बदलापूरमधील गोरगरिब महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांचे अंडाशय विकण्यास भाग पाडत होती.


या प्रकरणात पोलिसांनी सुलक्षणा गाडेकरसह उल्हासनगरातील तिची साथीदार अश्विनी चाबुकस्वार, मंजुषा वानखेडे या ३ महिलांना अटक केली. याप्रकरणाच्या तपासातून एकएक धक्कादायक माहिती उघड होताना दिसत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार या प्रकरणात ३०० हून अधिक महिला पीडित आहे. या सर्व महिलांना अंडाशयामागे २० हजार रुपये दिले जात होते. तर मध्यस्थ महिलांना प्रत्येकी ३ हजार रुपये देण्यात येत होते अशी उघड झाली आहे. या अंडाशयांची केरळ, तामिळनाडू, कर्नाटक, आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये विक्री केली जात होती. पोलिसांनी मात्र या संपूर्ण तस्करी प्रकरणाबद्दल काहीही बोलण्यास नकार दिलाय. गर्भाशयात स्त्री बीजाची वाढ होण्यासाठी लागणारे इंजेक्शन्स मुख्य आरोपी सुलक्षणा गाडेकरने आपल्या घरातच साठवले होते. ती महिला गरजू महिलांना पैशांचं आमिष दाखवून हे इंजेक्शन्स देत होती. तसंच डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय बेकायदेशीरपणे सोनोग्राफी देखील करून घ्यायची. गर्भाशयात स्त्री बिजाची वाढ झाल्यानंतर अशा महिलांना गाडेकर ही आयव्हीएफ सेंटरमध्ये पाठवायची. तिथं ऑपरेशन थिएटरमध्ये नेऊन गर्भाशयातील अंडाशय काढलं जायचे. त्यानंतर त्याची सऱ्हासपणे विक्री करण्यात येत होती.

**या अंडाशय तस्करी प्रकरणात अटक करण्यात आलेली मुख्य सूत्रधार सुलक्षणा गाडेकर ही बदलापुरातल्या खरवईतील नॅनो सिटीत राहत होती. महिनाभरापूर्वीच ती याठिकाणी राहण्यास आली होती. या नॅनो सिटीतील सी विंगमध्ये ९०३ क्रमांकाच्या फ्लॅटमध्ये ती राहत होती. मात्र काही दिवसांपूर्वीच तिने आपल्या नावाची पाटी देखील काढली. पोलिसांनी या महिलेच्या घराची झडती घेतली असता संशयास्पद इंजेक्शन सापडले. पोलिसांनी गाडेकरच्या घरातून गर्भाशयासाठी वापरण्यात येणाऱ्या इंजेक्शन्सचे फोटो, सोनोग्राफीचे फोटो, खोटी प्रतिज्ञापत्रं, महिलांचे फोटो आणि इतर संशयास्पद कागदपत्रे जप्त केली आहेत.**

## अल्पवयीन मुलांचे लैंगिक शोषण?

### शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांच्याविरुद्ध पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



प्रयागराज : अल्पवयीन मुलांच्या लैंगिक शोषणप्रकरणी शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रयागराजमधील झुंसी पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या एफआयआरमध्ये शंकराचार्यांचे शिष्य मुकुंदनंद यांचेही नाव आहे. त्यांच्यासह दोन-तीन अज्ञात व्यक्तींविरुद्धही पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आल्याचे झुंसी पोलिस ठाण्याचे प्रभारी महेश मिश्रा यांनी सांगितले.

जगद्गुरू रामभद्राचार्य यांचे शिष्य आशुतोष ब्रह्मचारी महाराज यांनी दाखल केलेल्या याचिकेनंतर प्रयागराज पोक्सो न्यायालयाने एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिले. आशुतोष ब्रह्मचारी यांनी दोन मुलांना न्यायालयात हजर केले आणि गंभीर आरोप केले. मुलांचे जबाब कॅमेऱ्यासमोर नोंदवण्यात आले. न्यायालयाने १३ फेब्रुवारीपर्यंत आपला आदेश राखून ठेवला.

तक्रारदार आशुतोष ब्रह्मचारी म्हणाले, आम्ही घरोघरी फिरत होतो. आम्ही पोलिसांकडे जात होतो. आमचा खटला ऐकला जात नव्हता. म्हणूनच आम्ही न्यायाच्या मंदिरात आलो. आज आम्हाला वाटते की न्याय अजूनही जिवंत आहे. न्यायालयाने आज आम्हाला न्याय दिला. मी आता स्पष्टपणे सांगू इच्छितो की शिष्यांवर लैंगिक अत्याचार करण्यात आले आणि त्यांना समलैंगिक कृत्ये करण्यास भाग पाडण्यात आले. **(पान ४ वर)**

# १ मार्चपासून दूध २ रुपयांनी महागणार!

### खरेदी दरातही वाढ : दूध महासंघाचा निर्णय



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** येत्या १ मार्च पासून राज्यभरात दुध महाग होणार आहे. दुधाच्या दरात प्रतीलिटर २ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. खासगी दुध संघाच्या बैठकीत आज हा महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळं आता ग्राहकांना १ मार्चपासून दुधाच्या खरेदीसाठी २ रुपये अधिकचे मोजावे लागणार आहेत.

दरम्यान, दुधाच्या खरेदीत ४ रुपयांनी वाढ झाल्याने हा निर्णय घेतल्याची माहिती दुध संघाने दिली आहे. दुध संघाचा विक्रीत १ रुपये तर वितरकांच्या कमिशनमध्ये १ रुपयांची वाढ केल्याचा निर्णय झाला आहे. दरम्यान, दुधाच्या दरात वाढ झाल्यानं ग्राहकांच्या खिशाला झळ बसणार आहे. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, दुधाच्या दरात होणारी ही दरवाढ येत्या १ मार्चपासून लागू होणार आहे. कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लिमिटेड (गोकुळ) ने म्हैस आणि गाईच्या दूध विक्री आणि खरेदी दरामध्ये वाढ करण्यात **(पान ४ वर)**

## संपादकीय

पान १ वरुन

# चारित्र्यसंपन्नतेचा 'अभिषेक' करावा

२०२३ मध्ये भाजप नेते किरीट सोमय्या यांच्या एका आक्षेपार्ह व्हिडिओने सोशल मीडियावर खळबळ उडवली. या व्हिडिओत सोमय्या एका महिलेसोबत संवेदनशील स्थितीत दिसत असल्याचा दावा करण्यात आला. सोमय्या यांनी हे व्हिडिओ बनावट असल्याचे सांगितले आणि तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तपासाची मागणी केली. त्यांनी मानहानीचे तीन खटलेही या प्रकरणात दाखल केले. विरोधकांनी यावरून सोम य्या यांच्यावर लैंगिक छळाचे आरोप केले. हे प्रकरण राजकीय षडयंत्राचा भाग असल्याचे सांगितले जाते, पण अशा घटनांमुळे नेत्यांच्या चारित्र्यावर प्रश्न उपस्थित होतात.

अहिल्यानगर जिल्ह्यातील माजी आमदार भानुदास मुरकुटे यांचे प्रकरणही तितकेच धक्कादायक आहे. २०२४ मध्ये ८२ वर्षीय मुरकुटे यांना ३२ वर्षीय महिलेवर २०१९ ते २०२३ दरम्यान अनेकदा बलात्कार केल्याच्या आरोपावरून अटक करण्यात आली. हे प्रकरण अहिल्यानगर पोलिसांनी दाखल केले आणि मुरकुटे यांना काही दिवस पोलिस कोठडीत ठेवण्यात आले. वयस्कर नेत्याच्या अशा कृत्याने समाजात आश्चर्य आणि संताप व्यक्त झाला. वय किंवा पद काहीही असले तरी नैतिकतेचा अभाव कसा समाजाला प्रभावित करतो, हे मुरकुटे यांच्या प्रकरणाने दाखवून दिले.

नुकतेच अहिल्यानगरचे माजी महापौर अभिषेक कळमकर यांचे प्रकरण समोर आले. एका २५ वर्षीय तरुणीने कळमकर यांच्यावर अत्याचाराचा गुन्हा दाखल केला. तक्रारीनुसार, कळमकर यांनी नोकरीच्या आमिषाने तरुणीला फसवले, अहिल्यानगर आणि पुणे येथील लॉजवर अत्याचार केले. व्हिडिओ कॉलवर कपडे काढण्यास भाग पाडले आणि व्हिडिओ रेकॉर्ड करून ब्लॅकमेल केले. हे प्रकरण एमआयडीसी पोलिस स्टेशनमध्ये दाखल झाले.

कळमकर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे शहर जिल्हाध्यक्ष आहेत. त्यांनी हे आरोप राजकीय षडयंत्र असल्याचे सांगितले आणि समर्थकांनीही हा प्रकार खोटा असल्याचे म्हटले. पण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. हे प्रकरण समाजात चर्चेचा विषय बनले आहे.

नेते आपल्या पदाचा दुरुपयोग कसा करतात आणि पीडितांना न्याय मिळवण्यासाठी किती संघर्ष करावा लागतो,

याची अनेकदा चर्चा होते. मात्र त्यातून समाज काही बोध घेतो असे दिसत नाही कारण अशा घटना वारंवार घडतच आहेत.ही प्रकरणेकेवळ महाराष्ट्रपुरती मर्यादित नाहीत. राष्ट्रीय स्तरावरही अशी उदाहरणे आहेत. २००९ मध्ये आंध्र प्रदेशचे राज्यपाल एन.डी. तिवारी यांचा एक व्हिडिओ व्हायरल झाला, ज्यात ते तीन महिलांसोबत दिसत होते. या वादाच्या पार्श्वभूम ीवर ८६ वर्षीय तिवारी यांनी आरोग्याच्या कारणास्तव राजीनामा दिला.

२०१० मध्ये हरियाणाचे नेते गोपाल कांडा आणि अमरमणी त्रिपाठी यांचीही अशी प्रकरणे समोर आली. अलीकडेच २०२२-२०२३ मध्ये महाराष्ट्रात हनीट्रॅप रॅकेट उघड झाले, ज्यात ७२ नेते आणि अधिकारी अडकले आणि करोडों रुपये देऊन व्हिडिओ दाबले गेले.

या सर्व प्रकरणांचा इतिहास पाहता, प्राचीन भारतातही नैतिकतेचे महत्त्व होते. अशोक राजाने धर्मनीतीचा प्रचार केला, तर महाभारतात युधिष्ठिराच्या चारित्र्यावरून युद्ध झाले. पण आधुनिक भारतात राजकारणात नैतिकतेचा ऱ्हास होत आहे. १९४८ च्या जीप स्कँडलपासून (भ्रष्टाचार) ते १९५८ च्या मुंध्रा स्कँडलपर्यंत (ज्यात अर्थमंत्री टी.टी. कृष्णमाचारी यांनी राजीनामा दिला), नैतिक जबाबदारी घेण्याची परंपरा होती. पण आज अशी प्रकरणे उघड झाल्यानंतरही नेते उजळ माथ्याने फिरतात. समाजाला यातून धडा घेण्याची गरज आहे. पोलिस प्रशासनाने निष्पक्ष तपास करावा आणि समाजाला सत्य सांगावे. अर्धवट तपासामुळे गैरसमज पसरतात आणि गुन्हेगार मुक्त फिरतात. सामाजिक जागृती आवश्यक आहे. स्त्रियांच्या सुरक्षेसाठी कडक कायदे आणि त्यांची अंमलबजावणी हवी. राजकीय पक्षांनी चारित्र्यसंपन्न उमेदवार निवडावेत. नाहीतर पुढची पिढी याच वाटेने जाईल आणि समाजाचा नैतिक पाया कमकुवत होईल.

शेवटी, नेत्यांचे चारित्र्य हे आरशासारखे स्वच्छ असावे. त्याचा ऱ्हास रोखण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊया. कायद्याची कठोर अंमलबजावणी आणि सामाजिक जागृतीच यावर उपाय आहे. अन्यथा, ज्यांना आदर्श मानले जातात ते ज्या वाटेने चालले त्याच वाटेने पुढची पिढी जाणार नाही याची काय खात्री? केवळ नाव अभिषेक असून चालणार नाही तर ज्यांना लोकशाहीत 'राज्याभिषेक' म्हणजेच सत्ता हवी आहे, त्यांनी चारित्र्यसंपन्नतेचा 'अभिषेक' करावा..!

# बंगळुरुत रंगणार इंटर-झोनल स्पर्धा ; आश्वीच्या पूनम खेमनरची दमदार झेप

रविंद्र बालोटे | राष्ट्र सह्याद्री

**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील आश्वी बुद्रुक येथील रहिवासी आणि मुंबई इंडियन्सच्या महिला संघाची धडाकेबाज अष्टपैलू खेळाडू पूनम खेमनर हिने आपल्या यशाचा आलेख उंचावत ठेवला आहे. बंगळुरू येथे होणाऱ्या प्रतिष्ठित 'इंटर-झोनल महिला क्रिकेट स्पर्धे'साठी पूनमची निवड करण्यात आली असून, तिच्या या यशामुळे संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात आनंदाचे वातावरण आहे.

सीनियर महिला एकदिवसीय देशांतर्गत लीगमधील उत्तुंग कामगिरीच्या जोरावर निवड समितीने पूनमच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे. बडोदा क्रिकेट असोसिएशनचे प्रतिनिधित्व करताना तिने आपल्या बॅट आणि बॉल दोन्हीने प्रतिस्पर्धी संघांना घाम फोडला. तिने या स्पर्धेत २८५ धावा कुटल्या आणि महत्त्वपूर्ण ५ बळी घेत आपली अष्टपैलू क्षमता सिद्ध केली. पूनमच्या या यशात प्रशिक्षक हेमंत पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असून त्यांच्या देखरेखीखाली तिने आपल्या खेळात मोठी सुधारणा केली आहे.

पूनमने केवळ देशांतर्गत क्रिकेटमध्येच नव्हे, तर महिला प्रीमियर लीगमध्ये मुंबई इंडियन्सकडून खेळताना आपल्या अष्टपैलू कामगिरीने क्रीडा विश्वाचे लक्ष वेधून घेतले होते. तिच्या मैदानावरील जबरदस्त जिद्दीची दखल खुद्द रिलायन्स फाऊंडेशनच्या अध्यक्षा नीता अंबानी यांनीही घेतली होती. त्यांनी तिला फोन करून तिच्या खेळाचे कौतुक केल्याने पूनमचा आत्मविश्वास द्विगुणित झाला आहे.

आश्वीसारख्या ग्रामीण भागातून सुरू झालेला तिचा हा प्रवास आता एका महत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचला असून, भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) यांनी आयोजित केलेल्या स्पर्धेत पश्चिम विभाग संघातून खेळताना तिला राष्ट्रीय स्तरावर आपली छाप पाडण्याची मोठी संधी मिळाली आहे.

दरम्यान पूनमच्या या निवडीनंतर आश्वीसह पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी मोठा आनंद व्यक्त केला आहे. मेहनत, समर्पण आणि सातत्य यांच्या बळावर तिने हे यश मिळवले आहे. तर, आगामी काळात पूनमची खेळाप्रती असलेली निष्ठा तिला नक्कीच भारतीय संघाच्या जर्सीपर्यंत घेऊन जाईल. असा विश्वास सर्वत्र व्यक्त केला जात असून पूनमने आता बंगळुरू येथील मैदान गाजवावे अशा शुभेच्छा ग्रामस्थांनी तिला दिल्या आहेत.



# एसटी चालक ज्ञानदेव आगळे व बाबासाहेब भिसे सेवानिवृत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** विना अपघात सेवा देऊन नेवासा एस टी आगाराचे चालक बाबासाहेब भिसे व चालक ज्ञानदेव आगळे हे प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले.सेवा निवृत्तीबद्दल त्यांचा नेवासा आगारात कर्मचारी वृंद व संत महंतांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी महंत ऋषिनाथ महाराज व बालब्रम्हचारी महंत गोपालानंदगिरी महाराज, पुरुषोत्तम सर्जे, अनिल ताके, वाहतूक नियंत्रक काकासाहेब पोटे, पत्रकार सुधीर चव्हाण, विलास काकडे,



अनिल टाके, भगवान आगळे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नेवासा डेपोचे स्थानक प्रमुख ज्ञानेश्वर मुरदारे हे होते.

यावेळी कामगार नेते रमेश दाणे यांनी आलेल्या मान्यवरांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. सेवानिवृत्त चालक ज्ञानदेव आगळे हे २१ वर्षे व चालक बाबासाहेब भिसे हे ३१ वर्षे विना अपघात सेवेङरे सेवानिवृत्त होत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी महंत ऋषिनाथ महाराज व गोपालानंदगिरी महाराज यांच्या हस्ते चालक आगळे व भिसे यांचा सन्मान करण्यात आला.

# ग्रामरोजगार सहाय्यकांचे धरणे आंदोलनासाठी प्रस्थान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**म्हैसगाव –** राहुरी, श्रीरामपूर, राहाता, पाथर्डी, अकोले, नेवासा आदी तालुक्यांतील ग्रामरोजगार सहाय्यकांनी मंगळवारी (दि. २४ फेब्रुवारी) मुंबई येथील आझाद मैदान येथे आयोजित राज्यस्तरीय धरणे आंदोलनात सहभागी होण्यासाठी प्रयाण केले.

अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष अनिल गंगावणे, जिल्हा उपाध्यक्ष तसेच विविध तालुका संघटनांचे अध्यक्ष, पदाधिकारी व सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या संख्येने ग्रामरोजगार सहाय्यक या आंदोलनात सहभागी होत आहेत.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, ३ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार (जीआर) मानधनवाढ जाहीर करण्यात आली असली तरी त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. तसेच गेल्या चार ते पाच महिन्यांपासून टक्केवारीनुसार मानधन नियमित मिळत नसल्याचा आरोपही संघटनेने केला आहे.



मानधनवाढ, थकीत देयके आणि इतर प्रलंबित मागण्यांसाठी राज्यस्तरीय आंदोलन पुकारण्यात आल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. ग्रामरोजगार सहाय्यकांचा मानधनवाढीचा प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित असून शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

राहुरी तालुक्यातून मुंबईकडे रवाना होण्यापूर्वी पदाधिकाऱ्यांनी शासनाला पुन्हा एकदा ठोस निर्णय घेण्याचे आवाहन केले. जीआर केवळ कागदावर न राहता त्याची अंमलबजावणी होऊन वाढीव मानधन नियमित मिळाले पाहिजे; तोपर्यंत आंदोलन सुरू राहील, असा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला. आंदोलन शांततेच्या मार्गाने पार पडणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# चौथ्या भुयारी पुलासाठी जागेची पाहणी सुरू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणतांबा :** रेल्वे खात्यामार्फत पुणतांबा येथे चौथ्या भुयारी पुलाच्या (अंडरपास) उभारणीसाठी जागेची पाहणी सुरू करण्यात आल्याची खात्रीलायक माहिती मिळाली आहे. भारतीय रेल्वेने दौंड–मनमाड रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाचे काम हाती घेतल्यानंतर ज्या ठिकाणी रेल्वे फाटके आहेत, त्या ठिकाणी भुयारी पूल उभारण्याची कामे अनेक ठिकाणी पूर्ण केली आहेत. मात्र पुणतांबा येथे काही कामे अद्याप प्रलंबित आहेत.

चांगदेव नगर येथील रेल्वे फाटकाजवळ सुमारे चार वर्षांपूर्वी भुयारी पुलाचे काम पूर्ण झाले आहे. तसेच शिर्डीकडे जाणाऱ्या एक्स्प्रेस गाड्यांचा वेळ वाचावा यासाठी दीड वर्षांपूर्वी चांगदेव नगर येथे कॉर्ड लाईनचे कामही पूर्ण करण्यात आले. त्यावेळी प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी पुणतांबा–चांगदेव नगर मार्गावर, चांगदेव नगरपासून सुमारे ४०० मीटर अंतरावर आणखी एक भुयारी पूल उभारण्यात आला आहे.

दरम्यान, पुणतांबा येथील नवीन रेल्वे फाटकाच्या उत्तरेला सुमारे ३०० मीटर अंतरावर ८ डिसेंबर २०२५ पासून तिसऱ्या भुयारी पुलाचे काम सुरू आहे. याशिवाय पुणतांबा–शिर्डी रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणासही मंजुरी मिळाली असून हे काम लवकरच सुरू होणार आहे.

मात्र पुणतांबा–चांगदेव नगर मार्गावर सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेच्या जलशुद्धीकरण केंद्राजवळ आणखी एक रेल्वे फाटक कार्यरत आहे. शिर्डीकडे जाणाऱ्या आणि येणाऱ्या रेल्वेगाड्यांची संख्या वाढत असल्याने हे फाटक वारंवार बंद ठेवावे लागते. त्यामुळे पुणतांबा–चांगदेव नगर–जळगाव–वाकडी तसेच चांगदेव नगरमार्गे श्रीरामपूरकडे जाणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित रेल्वे फाटकाच्या ठिकाणी तातडीने अंडरपास उभारावा, अशी मागणी जोर धरत आहे. त्यानुसार रेल्वे खात्याने सर्वेक्षणास सुरुवात केली असून दीड महिन्यापूर्वी फाटकाच्या पश्चिम बाजूस बोअर घेऊन भूगर्भातील मुरूम व दगडाच्या स्वरूपाचा प्राथमिक अंदाज घेण्यात आला आहे. दोन दिवसांपूर्वी



पर्यायी रस्ता सुरू करण्यासाठी काही जमिनीचे सपाटीकरणही करण्यात आले आहे. या हालचालींमुळे पुणतांबा येथे लवकरच चौथ्या भुयारी पुलाच्या कामाला सुरुवात होणार असल्याची चर्चा रंगू लागली आहे.

# सोनई- शनिशिंगणापूर पोलिस स्टेशन हद्दीत अवैध धंदे जोरात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनई :** अहिल्यानगर जिल्ह्यातील महत्व पूर्ण समजल्या जाणाऱ्या सोनई शनिशिंगणापूर परिसरात अवैध. धंदे सध्या जोरात चालू असून नागरिक यांमुळे त्रस्त झाले आहेत.

याबाबत सविस्तर वृत्त असे की गेल्या काही दिवसापासून या परिसरात अवैध्य धंद्यनी जोर धरला असून ,अनेकं तरुण युवा पिढी यामध्ये व्यसनाधीन होताना दिसून येत आहे.यामध्ये पोलिस प्रशासनानं वेळीच लक्ष देण्याची गरज आहे. नुकत्याच टोळी युद्धातून होणारे खून गावठी कट्याचा वापर वाढती गुन्हेगारी या सर्व बाबी चिंताजनक असून नवीन आलेले सहाय्यक पोलिस निरीक्षक अनिल मोरे कितपतं न्याय देतील हे महत्वाचे ठरणार आहे. सदर अधिकारी रुजू झाल्यापासून केवळ सत्कार घेण्यात मग्न असून पोलिस स्टेशनच्या जवळून रात्री मुरूम तस्करी वाहतूक ट्रॅक्टर डरे चालू असते अनेक प्रकारचे अवैध्य धंदे मोठ्या प्रमाणात सुरू झाल्याने अनेकांचा भ्रम नीरस झाला आहे.

पोलिस प्रशासनाने याबाबत योग्य ती खबरदारी घेऊन भविष्यात कुठला अनुचित प्रकार अथवा गुन्हेगारी होणार नाही याची दक्षता घ्यावी.अन्यथा संविधानातील लोकशाही मार्गाने तीव्र स्वरूपाचे आंदोलन सुरू करण्यात येईल असा इशारा काही सामाजिक संघटनांनी केला आहे.

# आजपासून सिंचनासाठी गोदावरी कालव्यांना आवर्तन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी :** गोदावरी कालव्याच्या लाभ क्षेत्रात मागील वर्षी समाधानकारक पाऊस झाला असला तरी फेब्रुवारी महिन्यातच उन्हाळा जाणवू लागला आहे. त्यामुळे सिंचनासाठी आवर्तन सोडण्यात यावे अशी शेतकऱ्यांची मागणी होती. त्या मागणीची दखल घेवून आ.आशुतोष काळे यांनी पाटबंधारे विभागाला लवकरात लवकर सिंचनासाठी आवर्तन सोडण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्या सूचनेनुसार उद्या (सोमवार) पासून गोदावरी उजव्या, डाव्या व नांदूर मध्यमेश्वर जलद कालव्याला सिंचनासाठी आवर्तन सोडण्यात येणार आहे.



गोदावरी कालव्याच्या लाभ क्षेत्रात रब्बी हंगामातील गहू, हरबरा,कांदे आदी पिकांबरोबरच इतर सर्वच पिकांना पोषक वातावरण असल्यामुळे सर्व पिके जोमात आहेत.परंतु उन्हाची तीव्रता वाढत असल्यामुळे पिकांना वेळेत आवर्तन उपलब्ध होणे गरजेचे होते. त्यामुळे गोदावरी कालव्यांना लवकरात लवकर आवर्तन सोडण्याबाबत आ. काळे यांनी पाटबंधारे विभागाला निर्देश दिले होते.

त्यानुसार पाटबंधारे विभागाने सुरू असलेल्या कालवा दुरुस्तीच्या कामाला गती देवून सुरू असलेली कामे पूर्ण करून उद्यापासून म्हणजेच सोमवार (दि.२३) पासून गोदावरी डाव्या,उजव्या व नांदुर मध्यमेश्वर एक्सप्रेस कलाव्याला सिंचनासाठी आवर्तन सोडण्यासाठी पूर्ण तयारी केली आहे.त्यामुळे गोदावरी कालव्याच्या लाभधारक क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या चिंता दूर होवून त्यांच्यामध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे.

# शिस्त आणि देशभक्तीनेच घडेल आदर्श पिढी : पो. नि. संजय ठेंगे



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आंबी :** छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवनकार्य केवळ वाचण्यापुरते मर्यादित नसून, ते अंगीकारण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या आयुष्यात शिस्त, देशभक्ती, कर्तव्यनिष्ठा आणि स्वाभिमानाला सर्वोच्च स्थान दिल्यास एक आदर्श समाज निर्माण होईल, असे प्रतिपादन पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी केले.

गुहा (ता. राहुरी) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आयोजित शिवजयंती उत्सवात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. कार्यक्रमाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. संध्या गवळी, अनुराधा भिंगारदिवे व छाया बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पोवाडे आणि ऐतिहासिक नाटिकांनी कार्यक्रमात रंगत भरली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुख्याध्यापक श्री. पठाण यांनी मान्यवरांचे स्वागत व सत्कार केला. यावेळी माजी सरपंच अरुणाताई ओहोळ, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिपक सौदागर, डॉ. विजय वाबळे, अविनाश ओहोळ, प्रमोद ओहोळ, चंद्रभान उऱ्हे, योगेश आंबेकर, संतोष सौदागर, संतोष ओहोळ, भाऊसाहेब कोळसे, अजय मांजरे, प्रकाश शिंदे, दादासाहेब कोळसे, नवनाथ सौदागर, रविंद्र डौले, देवराम ओहोळ, सुधीर ओहोळ आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोज ओहोळ यांनी तर आभार शिंदे यांनी मानले.

रमजानुल मुबारक २०२६
रोजा नंबर ०५

# आजारी रोजादारांनी नियोजन करणं महत्वाचं

उपवासाचे (रोजाचे ) काही ठराविक (मोजकेच )दिवस आहेत,जर कदाचित, तुमच्यापैकी एखादी व्यक्ती आजारी असेल, तर तिला उपवास करणं कठीण असेल, हानिकारक असेल, किंवा एखादी व्यक्ती प्रवासात असेल, तर इतर दिवशी ( राहून गेलेले )रोजा करून उपवासा ( रोजा ) ची संख्या पूर्ण करावी, ज्या लोकांना उपवास करतांना अतिशय कठीण प्रयास करावे लागत असतील. तर त्यांच्या साठीदुसरी सोपी गोस्ट ही आहेत कीं, ज्यांची कुवत ( एपत ) आहेत त्यांनी एका गरीबाला जेवण द्यावे, आणि एखाद्याला यापेक्षा जास्त पुण्य कमावायचे असतील तर ते कार्य अधिकच त्याच्या साठी चांगलीच गोस्ट असेल, तरीही उपवास करणे तुमच्यासाठी चांगलेच आहेत, जर तुम्हाला उपवास केल्याणे फायद्याचे ज्ञान असेल. ('' पवित्र कुरआन, सुरहा नं. ०२ सुरह बकराह, आ. नं. १८४).

आजारी व प्रवासात असणाऱ्या लोकांना अल्लाह ( परमेश्वर - ईश्वर ) राने सवलत दिलेली आहेत. फारच आजारी किंवा कठीण प्रवासात. फेब्रुवारी संपत असून नहीं , वातावरनात एक्दम उष्णता तर कधी थंड तर वेगवेगळया प्रकारे हवामान चालू आहेत, वातावरणाच्या या बदला मुळे सर्दी खोकला, घसा तडतड, कधी भरपूर खोकला . काहीं ना चक्कर येत आहेत, काहीच होतं नाहीं. वातावरणातील काही दिवस असेच चालू राहणारे आहेत दहा बारा दिवसांनतर वातावरणाची सवय झाल्या नंतर रोजा सुरुळीत राहील. काहीतरी कारणं शोधणार्यांना काही ना काही बहाणा लागत असतो शुल्लक कारणाने पवित्र रोजे सोडतात.

हजरत अबू हुरेरा रजि. सांगतात कीं, पैगंबर मुहम्मद स्व.नीं सांगितलं, जाणूनबुजून रमजानचे रोजे ( उपवास )सोडले, त्या नीं कितीही रोजे ( उपवास ) ठेवलं तरी त्या रमजान मधील एका रोजाची किंमत जन्मभर कधीहीं चुकवू शकणार नाहीत ( तिर्मिझी शरीफ ). विविध प्रकारच्या आजाराने त्रस्त आहेत उदाहरण म्हणून मधुमेही, हृदय विकार, थयोरॉईड, पॅरालिसिस, उच्च रक्तदाब, मिर्गी, रक्त गोठने, फिट येणे संधिवात, किडनी आजारा बरोबर होणारे इतर आजार. वयोरुद्ध व्यक्ती, वरील सर्व आजाराच्या रुग्णांना बाराही महिने औषधं द्यावे लागतात. अशा रोजा ठेवणाऱ्यां रोजदारांनी , रोजा दैनंदिन औषधा चे व्यवस्थित नियोजन करण्याची गरजेचं आहेत. काही वेळाकाही आजार हें सिरीयस आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाल्या वरच लक्षात येतात म्हणून वयोदृद्धनीं वेळोवेळी फॅमिली डॉक्टर कडून तपासनी करून नियोजन करणं गरजेचं असतं. जागतिक आरोग्य संघटना च्या २००३च्या सर्वे नुसार, जगातील एकूण, १९ कोटी मधुमेहीं रुग्णा पैकी एकट्या भारतात पांच(५) कोटी फक्त् भारतातच आहेत . भारत देश हा मधुमेही राजधानी झाली आहेत होतं आहेत. भारतदेश हा साथीच्या आजाराचे माहेरघर समजलं जायचं , प्रत्येक एक घरा आड - घर दर घर एक मधुमेह रुग्ण आढळत आहेत.. लहानलहान मुलांना सुद्धा मधुमेह, हृदय विकार, ब्लड प्रेशर, असे विविध आजार बघवयास मिळत आहेत. परंतु यातील खूप आजार नियंत्रणात आणता येतात त्यासाठी नियोजन करणं गरजेचे आहेत, असो.

मधुमेही रुग्णांनी रोजा ठेवताना प्रथम सर्व रिपोर्ट करून घेणं गरजेचं असतं, उदाहरणं रक्तातील साखरेचं प्रमाण, उपाशी पोटी ( ६० ते ९०/१०० ) व पोटभर खाल्यावर दोन तासाने( ९०-ते १४० मिलिग्राम ). असणं गरजेचे आहेत, प्रत्येक तीन ते सहा महिन्याने ॡअ१ल ही टेस्ट करून घेणं, त्यामुळे सहा महिन्याचा साखरेचा रेश्व ॲरींळे समजतो, मधुमेही चे रोजा मध्ये कधी कधी रक्तातील साखरेचं प्रमाण कमी होतं, शरीररातील साखरे व्यवस्था कोलंडून पडते त्यावेळी परिस्थिति फार हलख्याची आणीबाणी ची असते. इन्सुलिन इंजेक्शन घेणाऱ्या मधुमेही रोजा ठेवणाऱ्यानीं तर विशेष लक्ष देण्याची फार महत्वाचं आहेत..म्हणून तशी वेळ येऊ नयेत म्हणून नियोजन करणं महत्वाचं आहेत, त्या बरोबरच बहुतेक मधुमेहीना इश्रेव ॲिर्शीशॲ ही असतो किंवा थयोरॉईड िंहूॲेळव, ही असतात म्हणून अशा रुग्णांनी सेहरी करतांना सर्व अन्न घटक मर्यादित व योग्य प्रमाणात घेणं उचित असेल, त्या बरोबर दैनंदिन रोजच्या औषधं घेणं गरजेचे आहेत परंतु रोजा ठेवायचाच असेल आणि प्रचंड इच्छा शक्ती असेल तर इन्सुलिन चा डोस ( मात्रा ) चे प्रमाण थोडं कमी करावे, इन्सुलिन घेणाऱ्यानं आपल्या कायमच्या डॉक्टर कडून डोस ची व्यवस्थित करूनच इन्सुलिन घावी आपल्या स्वतः च्या मनाने कृपया काहीच करू नयेत. माझ्या मते मधुमेही रुग्णांनी आपल्या इन्सुलिन इंजेकशन चे डोस चे प्रमाण थोडेच ठेवावे कारण संपूर्ण महिना भर रोजे ठेवायचं असेल तर . ज्यांना उच्च रक्तदाब, थायरॉईड, मिर्गी, चक्कर भोवळ येत असेल, झटके येत असेल, संधिवात असेल अशा रोजा ठेवणाऱ्या रुग्णांनी औषधी डोस सेहरी मध्ये अर्धी अर्धीच अर्थात कमीत डोस घ्यावीत.. संध्याकाळी इफ्तार झाल्या नंतर पुर्ण डोस घ्यावीत. ज्यांचे हृदयाची अंजिओप्लास्टि केलेली असेल व पॅरालिसिस झालेल्या रोजा ठेवणाऱ्यांनी रक्त पातळ होण्याच्या व दैनंदिन डोस जरूर घ्यावेत.

आपल्या प्रकृती नुसार आपल्या रोजा चं नियोजन करणं गरजेचे आहेत.. मी म्हणतो भिऊ नका... नियोजन करा. प्रत्येक रोजा ठेवणाऱ्या आजारी बंधू बघीनींना विनंती आहेत की आपल्या आरोग्याची काळजी घेऊन, आपल्या स्वतःला झेपेल, सहन होईल अशी काळजीपुर्वक नियोजन करून रोजा ( उपवास ) करावेत..पर्याय भरपूर दिलेले आहेत. इस्लाम मध्ये कोणत्याही गोष्टीची सक्ती केलेली नाहीत.. कारण समाजात या बद्दल खुप गैरसमज आहेत. अल्लाह ( परमेश्वर - ईश्वर,) हा दयाळू - कृपाळू आहेत निष्ठुर तर कधीच नाहीं...



डॉ. सलीम शेख
बैतुशशिफा मल्टिस्पेशालिटी दवाखाना.
श्रीरामपूर, जि. अहमदनगर
मो. ९२७१६४००१४

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# हजारो विद्यार्थ्यांनी अभ्यासली संगमनेरची सहकार पंढरी

## ६००० विद्यार्थ्यांची थोरात कारखाना, दूध संघ, इंजिनिअरिंग कॉलेजला भेट



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : दुष्काळी तालुका ते वैभवशाली तालुका या वाटचालीमध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान असणाऱ्या सहकारातील विविध संस्थांची पाहणी व अभ्यास महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थ्यांनी केला असून या विद्यार्थ्यांनी अभ्यासलेली सहकार पंढरी ही पुस्तकी ज्ञानाबरोबर त्यांच्या जीवनासाठी महत्त्वाची शिदोरी ठरणार असून माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सहकारातील विविध संस्था पाहून सर्व विद्यार्थी भारावले. थोर स्वातंत्र्यसेनानी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी सहकाराचा राजमार्ग निवडून संगमनेर तालुक्यामध्ये विकासाची पायाभरणी केली. कारखाना, दूध संघ, शेतकी संघ, अमृतवाहिनी बँक या विविध सहकारी संस्थांबरोबर गुणवत्तेच्या शैक्षणिक संस्था उभ्या केल्या. महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते तथा मा.कृषी व शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली हा सहकार आज देशाला दिशादर्शक ठरतो आहे.

गाव पातळी ते शिखर संस्था याचबरोबर गुणवत्तेच्या शिक्षण संस्था, चाळीस वर्षांचे अविश्रांत काम त्यातून निर्माण झालेली समृद्धी गावागावात आलेल्या विकास, शहरात झालेल्या वैभवशाली इमारती आणि निळवंडे धरण यामुळे संगमनेर तालुका आज राज्यात प्रगतशील म्हणून ओळखला जातो. या विकासाच्या वाटचालीत अत्यंत महत्त्वपूर्ण असणाऱ्या सहकारातील विविध संस्थांना युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉक्टर जयश्रीताई थोरात यांच्या पुढाकारातून तालुक्यातील ६७९० शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या. शालेय जीवनापासूनच शेती, सहकार चळवळ आणि आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळावी या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या भेटीमध्ये थोरात सहकारी साखर कारखाना,राजहंस दूध संघ,अमृतवाहिनी सहकारी बँक, अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेज, डेंटल कॉलेज याचबरोबर विविध सहकारी संस्थांचा अभ्यास विद्यार्थ्यांनी केला. कारखान्यांमध्ये शेतातून आलेला ऊस ते उत्पादित होणारी साखर याचबरोबर अल्कोहोल, वीज निर्मिती ही प्रक्रिया विद्यार्थ्यांनी अभ्यासली याचबरोबर दूध त्यावर होणाऱ्या प्रक्रिया याचबरोबर उप पदार्थांची निर्मिती याचा अभ्यासही विद्यार्थ्यांनी केला. सहकाराबरोबर शिक्षणामधील अग्रगण्य असणाऱ्या अमृतवाहिनी मधील इंजिनिअरिंग कॉलेज, पॉलीटेक्निक, एमबीए, फार्मसी, डेंटल कॉलेज या सर्व संस्थांनाही विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या.

अमृत उद्योग समूहातील हिरवाईचा आणि स्वच्छ परिसर शिस्तबद्ध वातावरण नव्याने उभी राहिलेली कारखान्याची भव्य प्रशासकीय इमारत, अमृतेश्वराचे मंदिर, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांचे प्रेरणास्थळ, अमृतवाहिनीतील बांबूचे बन, दररोज हजारो नागरिकांची होणारी वरदळ, सर्वांचे स्वागत आणि प्रसन्न वातावरण यामुळे सर्व विद्यार्थी या सहकार पंढरीत भारावून गेले.

या सर्व विद्यार्थ्यांनी या भेटी दरम्यान महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात, मा.आ.डॉ.सुधीर तांबे, रणजीतसिंह देशमुख याचबरोबर विविध मान्यवरांशी संवाद साधला. श्रमिक महाविद्यालय, पानवडी येथील सह्याद्री इंटरनॅशनल स्कूल अमृतवाहिनी मधील विविध स्कूल, संगमनेर शहरातील विविध महाविद्यालय या सर्व विद्यार्थ्यांनी विविध संस्थांना भेटी दिल्या.

## द•ख•ल

### श्री गुरु शारदा संगीत विद्यालयाचे यश



**वडाळा महादेव** : येथील श्रीगुरु शारदा संगीत विद्यालयामधील विद्यार्थ्यांनी अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ मुंबई यांच्या मार्फत नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यामध्ये घेण्यात आलेल्या संगीत-गायन व हार्मोनियम परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. यावेळी प्रारंभिक गायन परीक्षेमध्ये ध्रुवी लक्ष्मणअभंग, खुशी गायकवाड, श्रीजा काळे, ओवी कुलकर्णी, आराध्या शिंदे, रुद्रानी गोसावी, प्राजक्ता कुलकर्णी, पुनीत गंगावल, रुद्र घोरपडे हे विद्यार्थी यशस्वी झाले. तर हार्मोनियम परीक्षेत मिष्ठी कल्पेश चोरडिया,वेदिका योगेश गाडेकर, वेदांत योगेश गाडेकर,लबोनी विजय करपे,आरोही विनोद बागुल,आराध्या प्रशांत गागरे,प्रशांत घागरे तर बासरी वादन परीक्षेत इशिता राहुल राऊत ही विद्यार्थिनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाली.

### सरोजिनी कापसे यांची नर्मदा परिक्रमा पूर्ण

**टाकळीभान** : मा. प्राचार्य सरोजिनी कापसे यांनी नर्मदा परिक्रमा भक्तिभावाने पूर्ण केली. नर्मदा परिक्रमा यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल त्यांचे टाकळीभान, तसेच श्रीरामपूर येथील मान्यवर, पदाधिकारी, आप्तेष्ट, स्नेही, नातेवाईक, कुटुंबीय यांच्यावतीने उत्स्फूर्त पणे स्वागत व सत्कार करण्यात आला. नर्मदा परिक्रमा पूर्ण करण्याची त्यांची मनोमन इच्छा होती. ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी त्यांनी परिक्रमेला सुरुवात केली. व अनेक संकटांचा सामना करत खडतर प्रवासातून त्यांनी व मंगळवार दि. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी त्यांनी ती यशस्वीरित्या पूर्ण केली. स्वागत प्रसंगी श्रीरामपूरच्या नगरसेवक प्रणिती चव्हाण, टाकळीभानचे माजी उपसरपंच राजेंद्र कोकणे, शेतकरी संघटनेचे प्रवक्ते प्रा. कार्लस साठे सर, आबासाहेब आहेर, अर्जुन राऊत, राम भवर, दादासाहेब कापसे, प्रल्हाद कापसे, श्रीहर्ष कापसे आदीसह कापसे कुटुंबियांचा मित्रपरिवार, महिला मंडळ, नातेवाईक, स्नेही जन उपस्थित होते.

### तरुणांनी शिवचरित्र आत्मसात करावे : प्रा.साईप्रसाद कुंभकर्ण



**कोल्हार** : श्रीरामपूर तालुक्यातील फत्याबाद येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात व्याख्याते प्रा. साईप्रसाद कुंभकर्ण यांचे प्रेरणादायी व्याख्यान उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमाला गावातील ग्रामस्थ, विद्यार्थी, महिला तसेच ग्रामस्थांची उपस्थिती लाभली होती. आपल्या व्याख्यानात व्याख्याते प्रा.साईप्रसाद कुंभकर्ण यांनी छत्रपती शिवरायांच्या जीवनातील पराक्रम, स्वराज्य स्थापनेची दूरदृष्टी, शिस्तबद्ध प्रशासन आणि राज्याभिषेक यावर सविस्तर प्रकाश टाकला. शिवचरित्रातून तरुणांनी राष्ट्रप्रेम, स्वाभिमान आणि कर्तव्यनिष्ठा यांचे धडे घ्यावेत व तरुणांनी शिवचरित्र आत्मसात केले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी शिवप्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद आठरे व आभार गुणवत आठरे यांनी मानले.

### गटकळ इंग्लिश स्कूलमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील लेट एकनाथ नामदेव गटकळ इंग्लीश मीडीयम स्कुलमध्ये अॅड.भाऊसाहेब टेमक व अॅड.सुरेखा टेमक यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधत भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली. बुधवार दि.१७ रोजी शाळेतील विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज व मावळ्यांची वेशभुषा परिधान करून मिरवणूकीत सहभाग नोंदविला. शाळेपासून ढोल-ताश्यांच्या गजरात सजवलेल्या ट्रॅक्टरमधून ही मिरवणूक स्टॅन्ड परिसरातून मार्गक्रमण करत सेवा संस्थेच्या प्रांगणात जावून संपन्न झाली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषाने आसमंत दुमदुमून गेला होता. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून पुजन करण्यात आले. त्यानंतर आरती संपन्न झाली. यावेळी वेशभूषा परिधान केलेल्या विद्यार्थ्यांनी पोवाडे, घोषणाबाजी, शिवकालीन खेळ आणी पथनाट्याद्वारे महाराजांच्या शौर्याचे दर्शन घडविले. विद्यार्थ्यांनी केलेल्या सादरीकरणाणे उपस्थितांचे लक्ष वेधले होते. यावेळी सेवा संस्थेचे अध्यक्ष मंजाबापू थोरात, कारेगाव भाग संचालक शिवाजीराव शिंदे, माजी उपसरपंच राजेंद्र कोकणे, बा.स.संचालक मयुर पटारे, प्रा.जयकर मगर, उपाध्यक्ष अविनाश लोखंडे, माजी उपसरपंच भारत भवार, संत सावताचे संचिलक विलास दाभाडे, बापूसाहेब शिंदे, मच्छिंद्र बोडखे, बंडोपंत बोडखे, काकासाहेब डिके, अनिल बोडखे, विलास बोडखे, ऊमेश त्रिभूवन, उपस्थित होते.

# शंभूक वसतिगृहात छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : बहुजन शिक्षण संघ संचलित शंभूक विद्यार्थी वसतिगृहात लोककल्याणकारी राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात नवनाथ अकोलकर, निळकंठ तरकासे, प्रा. सुनिल वाघमारे व संतोष त्रिभुवन यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी ढोल-ताशांच्या गजरात महाराजांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढली. नगरपरिषद आवारातील तसेच भाजी मंडईजवळील शिवतीर्थ येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून मिरवणूक शहरातील मुख्य रस्त्यांवरून वसतिगृहात परतली.




दुसऱ्या सत्रात शिवचरित्र अभ्यासक व व्याख्याते नवनाथ अकोलकर यांनी महाराजांच्या जीवनकार्यावर मार्गदर्शन करताना स्वराज्याची संकल्पना, शौर्य व लोककल्याणकारी धोरणांचा ऊहापोह केला. यावेळी मिशन वात्सल्य शासकीय समितीचे सदस्य मिलिंदकुमार साळवे, परिवर्तन फाउंडेशनचे विश्वस्त डॉ. संजय दुशिंग, गीतकार व प्रबोधनकार निळकंठ तरकासे तसेच परिवर्तन फाउंडेशनचे विश्वस्त व युनायटेड इन्शुरन्सचे गोरख आढाव यांनी विद्यार्थ्यांना जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. विद्यार्थी विराज घुले, अमोल घुले, ओम जवादे, ऋषिकेश सुलताने व यश त्रिभुवन यांनी शिवचरित्रावर भाषणे केली.

संग्राम तुजारे, गौरव कहाते व अजय जाधव यांनी पोवाडे सादर करत उपस्थितांची मने जिंकली. सोहम मगरे, आर्यन घुले व शिवम माळी यांनी मिरवणुकीत ढोल-ताशांवर प्रभावी वादन केले. कार्यक्रमास विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे ड. अमोल सोनवणे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा सचिव सुनिल वाघमारे, कविता दिवे, शिवानी दिवे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सिध्दार्थ दिवे, आर्यन घुले, शिवम माळी, अर्जुन पवार व ओम कटारनवरे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन अशोकराव दिवे यांनी केले, तर आभार प्रदर्शन शिंपी समाज पंच मंडळाचे अध्यक्ष कैलास खंदारे यांनी केले.

# पीयूसी साठी आधार प्रमाणिकरण मोबाईल अनिवार्य

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : पीयूसी सेवेसाठी वाहन मालकाचा आधार प्रमाणिकरण केलेला मोबाईल क्रमांक अनिवार्य करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे. केंद्र शासनाच्या सूचनांनुसार वाहन मालकांचे अद्ययावत संपर्क तपशिल वाहन प्रणालीमध्ये उपलब्ध नसल्यामुळे पीयूसी, विमा, कर, दंड (इ-चलन) इत्यादी वाहनासंबंधी महत्वाच्या सूचना वाहनधारकांपर्यंत पोहचण्यात अडचणी निर्माण होतात. या पार्श्वभूमीवर पीयूसी सेवेसाठी वाहन मालकाचा आधार प्रमाणिकरण केलेला मोबाईल क्रमांक अनिवार्य करण्याचा मोठा आणि ऐतिहासिक निर्णय केंद्र शासनाने घेतलेला आहे. त्यानुसार पीयूसी सेवा देताना वाहन मालकाचा आधार-प्रमाणीकरण केलेला मोबाईल क्रमांक उपलब्ध नसल्यास पीयूसी सेवा देण्यात येणार नाही. या प्रक्रिया वाहन प्रणालीवर दोन स्तरीय प्रमाणीकरण वापरून राबविण्यात यावीत. ही संपूर्ण अंमलबजावणी एका महिन्याच्या कालावधीत पूर्णपणे कार्यान्वित करण्यात यावी, असेही सरकारकडून सूचित करण्यात आले आहे. दरम्यान यामुळे पियूसी साठी अधिक पारदर्शक पणा सिद्ध होणार आहे. दिवसेंदिवस परिवहन खात्यात अनेक महत्त्वाचे बदल होताना दिसत असून याबाबत प्रशासकीय कामकाजात अधिक गतिमानता येणार आहे. प्रचलित नियमांनुसार, पीयूसी केंद्रावर वाहनाची चाचणी घेताना मालकाच्या आधारशी जोडलेल्या मोबाईलवर ओटीपी येईल, तो प्रविष्ट केल्यानंतरच प्रमाणपत्र जारी केले जाईल. मोबाईल क्रमांक आधारशी जोडलेला असणे आवश्यक आहे. केंद्रावर फोटो काढण्यापूर्वी आणि नंतर मोबाईल प्रमाणीकरण केले जाते. १५ जानेवारी २०२६ च्या नवीन पत्रानुसार, 'वाहन' प्रणालीमध्ये अचूक माहिती आणि पारदर्शकता आणण्यासाठी हा बदल करण्यात आला असल्याचे प्रादेशिक परिवहन खात्याकडून सांगण्यात आले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार विकासाचा पाया : स्नेहलता कोल्हे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आजच्या काळातही तितकेच मार्गदर्शक आहेत. स्वराज्य, न्याय, स्त्री-सन्मान आणि सर्वधर्मसमभाव या मूल्यांचा आपल्या दैनंदिन जीवनात अवलंब केला, तरच आपण खऱ्या अर्थाने छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करू शकतो. प्रत्येकाने आपल्या कार्यातून प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि समाजहिताची जाणीव जपली, तर महाराजांचे स्वप्न साकार होण्यास हातभार लागेल. त्यांच्या समावेशक विचारांच्या दिशेने प्रत्येकाने पाऊल टाकले पाहिजे, असे प्रतिपादन मा. आ. स्नेहलताताई कोल्हे यांनी केले. कोपरगाव नगरपरिषदेच्या वतीने १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक मैदान येथे जयंतीउत्सव सोहळा




२०२६ चे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी सकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिषेक करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. आ.स्नेहलताताई कोल्हे होत्या. कार्यक्रमाचे उद्घाटन युवानेते विवेक कोल्हे, संजीवनी शिक्षण संस्थेचे विश्वस्त सुमित कोल्हे तसेच संजीवनी स्वयंसहायता महिला बचत गटाच्या अध्यक्षा रेणुकाताई कोल्हे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी युवा नेते विवेक कोल्हे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज हे आपल्या सर्वांसाठी प्रेरणास्थान आहेत.त्यांच्या विचारांमध्ये सामान्य माणसाच्या हिताचा विचार होता. आजच्या तरुणांनी त्यांचा आदर्श समोर ठेवून प्रामाणिकपणे काम केले पाहिजे. स्वराज्य, शिस्त आणि धैर्य ही मूल्ये आपण आयुष्यात अंगीकारली पाहिजेत. समाजासाठी काहीतरी करण्याची भावना प्रत्येकामध्ये असावी. स्त्री-सन्मान आणि न्याय या तत्त्वांचे पालन करणे हीच खरी मानवंदना आहे.

आपण एकत्र राहून समाजाच्या प्रगतीसाठी प्रयत्न केले पाहिजेत. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आपल्याला आत्मविश्वास देत असल्याचे त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले. याप्रसंगी मा. आ. स्नेहलताताई कोल्हे, युवा नेते विवेक कोल्हे, संजीवनी ग्रामीण शिक्षण संस्थेचे ट्रस्टी सुमित कोल्हे, संजीवनी स्वयंसहायता महिला बचत गटाच्या अध्यक्षा रेणुकाताई कोल्हे,कोपरगाव नगरपालिकेचे नगराध्यक्ष पराग संधान, उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर, मुख्याधिकारी सुहास जगताप यांच्यासह नगरपालिकेचे नगरसेवक, नगरसेविका, विविध क्षेत्रातील मान्यवर,अधिकारी,कर्मचारी,विद्यार्थी,पालक तसेच कोपरगाव शहरातील समस्त शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकस्थळी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे सकाळी अभिषेक, आरती व मानवंदना करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषाने सर्व परिसर दुमदुमून गेला. संत ज्ञानेश्वर इंग्लीश मिडीयम स्कूल, संजीवनी इंग्लीश मिडीयम स्कूल, पदमा मेहता प्राथमिक विद्यालय, भागचंद माणिकचंद ठोळे प्राथमिक विद्यालय, के.बी.पी. माध्यमिक विद्यालय, लायन्स मुक-बधिर विद्यालय, डॉ. सी.एम. मेहता कन्या विद्यामंदिर, एम. के. आढाव माध्यमिक विद्यालय, विद्या प्रबोधिनी प्राथ. व माध्य. विद्यालय, आत्मा मालिक ओम गुरूदेव गुरूकुल, कोकमठाण आत्मा मालिक ओम गुरूदेव इंलीश मिडीयम स्कूल, के. जे. सोमय्या कॉलेज, शांभवी ग्रुप या शाळा व महाविद्यालयांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

# तालुक्यात ६ हजार १८९ दहावीचे परीक्षार्थी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा व घोडेगाव विभागातील परीक्षा केंद्रावर ६ हजार १८९ परीक्षार्थी दहावीच्या परीक्षेला बसले असून नेवासा तालुक्यात दहावीच्या परीक्षा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शिक्षण विभागामार्फत यंत्रणा सज्ज करण्यात आली असल्याने दहावीच्या परीक्षेला तालुक्यात उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला असल्याचे नेवासा पंचायत समितीच्या शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी संजय कळमकर यांनी सांगितले. नेवासा तालुक्यात नेवासा येथे ज्ञानोदय इंग्लिश स्कूलमध्ये ६४२ विद्यार्थी परीक्षेसाठी बसले असून उस्थळ दुमाला येथे श्री समर्थ सद्गुरु किसनगिरी बाबा विद्यालयात येथे २४८ विद्यार्थ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.भेंडा येथील जिजामाता माध्यमिक विद्यालयात ६३२ विद्यार्थी परीक्षा देणार असून जळके खुर्द येथे गुरुदास भास्करगिरीजी महाराज माध्यमिक विद्यालयात ५६६ विद्यार्थ्यांची नोंद आहे.

श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, करंजगाव येथे २७९ विद्यार्थी परीक्षा देत असून श्री दादासाहेब घाडगे पाटील माध्यमिक विद्यालय येथे ४२० विद्यार्थी, श्री हनुमान विद्यालय, बेलपिंपळगाव येथे २६९ विद्यार्थी, कुकाणा इंग्लिश स्कूल येथे ५४८ विद्यार्थी आणि ज्ञानेश्वर विद्यालय, खरवंडी येथे २६३ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. नेवासा विभागातील एकूण विद्यार्थ्यांची संख्या ४,४३५ इतकी आहे.दरम्यान, घोडेगाव विभागातील परीक्षा केंद्रांवर ही विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था पूर्ण करण्यात आली आहे. श्री घोडेश्वर विद्यालय, घोडेगाव येथे ३८० विद्यार्थी, शनेश्वर विद्यालय, साई येथे ३४० विद्यार्थी, न्यू इंग्लिश स्कूल, जांभूळ येथे ४५६ विद्यार्थी, जवाहर विद्यालय, चांदा येथे ३४९ विद्यार्थी तसेच ज्ञानप्रबोधिनी पब्लिक स्कूल, पिंपरी येथे २२९ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. घोडेगाव विभागातील या पाच केंद्रांवर एकूण १,७५४ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. दोन्ही विभागांतील सर्व परीक्षा केंद्रांवर आवश्यक मनुष्यबळ, बैठक व्यवस्था व अन्य सोयी-सुविधांची पूर्तता करण्यात आली.

# पुस्तक वाचनाने व्यक्तिमत्व घडते : राहुल शेळके

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**भेंडा** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गळनिंब येथे 'कुसुमाग्रज वाचनालयाचे उद्घाटन जिल्हा परिषद अहिल्यानगरचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके यांच्या हस्ते उत्साहात झाले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या वाचनालय निर्मिती अभियानांतर्गत हा उपक्रम साकारण्यात आला. उद्घाटनापूर्वी विद्यार्थ्यांनी गावातून ग्रंथदिंडी काढून वाचनाचा संदेश दिला. ढोल-ताशे व लेझीम पथकाच्या गजरात पारंपरिक वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांचे लक्ष वेधले. कार्यक्रमात बोलताना शेळके यांनी पुस्तक वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले. आदर्श व्यक्तिमत्व घडवायचे असेल तर शालेय जीवनापासून वाचनाची सवय लावणे गरजेचे आहे. समाज माध्यमांच्या प्रभावामुळे मोबाईलचे व्यसन वाढत असून वाचनाकडे दुर्लक्ष होत आहे. ही प्रवृत्ती बदलण्यासाठी वाचन संस्कृती रुजविणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. माजी विद्यार्थी संघाच्या सहकार्याने शाळेसाठी १५ हजार रुपयांची पुस्तके खरेदी करण्यात आली आहेत. आठवड्यातून दोन दिवस 'वाचन बेल' उपक्रम राबविण्यात येणार असून विद्यार्थ्यांना ४५ मिनिटे वाचन करून त्यावरील नोंदी सादर कराव्या लागणार आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक भारत गवळी यांनी केले. सूत्रसंचालन दिपाली जाधव यांनी तर आभार प्रदर्शन भानुदास घाडगे यांनी केले.

# पाझर तलावातील पाण्याचा रब्बी हंगामासाठी 'संजीवनी' : आ खताळ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : निळवंडे डाव्या कालव्यातून कासारे येथील पाझर तलावात पाणी सोडण्यात आल्याने लोहारे, कासारे आणि मेंढवन परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. अनेक वर्षे दुष्काळाच्या झळा सहन करणाऱ्या या भागात अखेर पाण्याचा प्रवाह पोहोचल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य उमटले आहे. रब्बी हंगामातील पिकांसाठी हे पाणी 'संजीवनी' ठरणार असल्याची भावना आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केली आहे.

संगमनेर तालुक्यातील लोहारे कासारे येथील पाझर तलावातून रविवारी आ अमोल खताळ यांच्या हस्ते पाण्याचे विधिवत पूजन करून पाझर तलावा तून शेतीच्या रब्बी हंगामासाठी पाणी सोडण्यात आले त्यावेळी आयोजित कार्यक्रमात आमदार खताळ बोलत होते.

यावेळी पाटबंधारे विभागाचे उपअभियंता प्रीतम शेवाळे,कार्यकारी अभियंता अमोल कवडे दिलीप पोकळे, अण्णासाहेब सोमवंशी, दत्तू पोकळे, विजय पोकळे, नवनाथ कानकाटे रमेश कानकाटे, घनश्याम भास्कर दीपक कदम बाळासाहेब पोकळे शिवाजी पोकळे विजय पोकळे दिलीप पोकळे वाल्मीक पोकळे दीपक



कदम बाळासाहेब पोकळे गोरख पोकळे शुभम पोकळे सुधीर पोकळे विजय दिघे मोहन पोकळे चंदू कारले सागर कारले दिलीप गायकवाड नाना कारले बाळासाहेब कारले यमनाथ कारले रघु कारले रामनाथ बो-हाडे मेंढवण येथील शरद यलमामेआणि बाळासाहेब बढे यांच्या सह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> पाझर तलावाची उभारणी होऊन अनेक वर्षे लोटली; मात्र या प्रकल्पात नियमित पाणी येत नव्हते. आता जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार अमोल खताळ यांच्या विशेष प्रयत्नांमुळे तलावात पाणी उपलब्ध झाले आहे. पुढेही हा प्रकल्प सातत्याने कार्यरत राहून परिसरासाठी 'संजीवनी' ठरेल.
>
> **प्रीतम शेवाळे, कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग**

आमदार खताळ म्हणाले की, लोहारे कसारे मेंढवन हाफ परिसर पूर्वी दुष्काळी भाग म्हणून ओळखला जात होता .अनेक पिढ्यांनी पाणी टंचाईचा सामना केला. शेतकऱ्यांना पावसाच्या लहरीवर अवलंबून राहावे लागायचे. अनेकदा तलाव कोरडेच राहायचे, त्यामुळे पिकांचे नुकसान व्हायचे.

मात्र राज्यातील महायुती सरकारच्या प्रयत्नांमुळे आणि मुख्य मंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आज हा ऐतिहासिक क्षण साध्य झाला आहे. लोहारे-कासारे शिवारातील काथ नदीवर लघु पाट बंधारे विभागामार्फत सन १९६६ मध्ये या पाझर तलावाची उभारणी करण्यात आली होती. या तलावाची साठवण क्षमता ४३.२८ दशलक्ष घनफूट इतकी आहे. अनेक वर्षे पाण्याअभावी ही क्षमता कधीच पूर्णपणे वापरात आली नव्हती. परंतु यंदा तलावात २९.०३० दशलक्ष घनफूट इतका पाणीसाठा उपलब्ध झाला आहे.

या पाण्यामुळे लोहारे, कासारे आणि मेंढवन या गावांतील सुमारे १७८ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

## पान १ वरुन

### आदिवासी पाडा, तिथे एसटी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

आता केवळ गाव तिथे एसटी नाही, तर आदिवासी पाडा तिथे एसटी, असा ठाम निर्धार करत त्यांनी विकासाचा नवा अध्याय सुरू केल्याची घोषणा केली.
स्वातंत्र्यानंतरच्या आठ दशकांत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात एसटी पोहोचली. आज तब्बल ९३% लोकसंख्या एसटी सेवेशी जोडलेली आहे. तरीही सह्याद्री व मेळघाटच्या दऱ्याखोऱ्यातील अनेक पाडे विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूरच राहिले होते. मोठ्या बसेसना तिथे प्रवेश शक्य नव्हता; त्यामुळे शिक्षण, आरोग्य आणि रोजगारासाठी आदिवासी बांधवांना अनेक किलोमीटरची पायपीट करावी लागत होती. आता मात्र ही पायपीट थांबणार आहे.
मंत्री सरनाईक यांनी आशावाद व्यक्त करत सांगितले की, दुर्गम भागातील आपला आदिवासी समाज आता एसटीच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्राशी जोडला जाईल. विकासाची गंगा प्रत्येक पाड्यापर्यंत पोहोचवण्याचा हा आमचा निर्धार आहे.

### तरुणांना ड्रग्स अन् विरोधकांना चहा..?

आम्हाला चहा प्यायचा नाही. ऋडान्सबार वरती रेड होते, त्यात अनेक महिला सापडतात. लाडकी बहिण योजनेमुळे कर्ज बाजारी झालो हे सांगुन अनेक महिलांचा लाभ बंद केला. सभापती किंवा अध्यक्ष कधीही पक्षाच्या कार्यक्रमाला जात नाही.मात्र अध्यक्ष पक्षाचा दुपट्टा घालून प्रचार करतात, असे आरोपही भास्कर जाधव यांनी केलेत. अध्यक्ष जमीन गरिबांना द्यायला गेले होते की हडप करायला गेले होते? हे कळत नाही असेही ते म्हणाले.

### १ मार्चपासून दूध २ रुपयांनी महागणार!

आली आहे. म्हशीच्या दुधासाठी प्रति लिटर १ रुपयांनी आणि गाईच्या दुधासाठी प्रतिलिटर २ रुपयांची खरेदी वाढ केली आहे. याआधी म्हशीचे दूध प्रति लिटर ५२.५० पैसे दराने खरेदी केले जायचे आता ५३.५० रुपयांनी खरेदी केले जाणार आहे. तर गायीचे दूध ३४ रुपयांनी खरेदी केले जायचे आता ३६ रुपये प्रति लिटर दराने दूध खरेदी केले जाणार आहे. यामुळं शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.
गोकुळ कडून म्हशीच्या दूध विक्री दरामध्ये दोन रुपयांनी वाढ केली आहे. त्यामुळं शेतकऱ्यांना एक प्रकारे दिलासा मिळाला आहे. याआधी म्हशीचे दूध ६८ रुपयांनी विकले जात होते मात्र आता ते ७० रुपयांनी प्रतिलिटर विकले जाणार आहे. आज संध्याकाळपासून नवे दर लागू होणार आहेत. गोकुळ संचालकांच्या बैठकीमध्ये दूध दरवाढीसंदर्भात महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.
दरम्यान, दुधाच्या दरात वाढ झाल्यानं ग्राहकांच्या खिशाला अधिकची झळ बसणार आहे. दुधाच्या खरेदीत ४ रुपयांनी वाढ झाल्याने हा निर्णय घेतल्याची माहिती खासजी दुध संघानं दिली आहे. दुध संघाचा विक्रीत १ रुपये तर वितरकांच्या कमिशनमध्ये १ रुपयांची वाढ केल्याचा निर्णय झाला असल्याची माहिती देखील खासजी दुध संघाकडून देण्यात आली आहे.

### मुख्यमंत्र्यांचे विरोधकांना आवाहन : आजपासून अर्थसंकल्पीय अधिवेशन

अर्थसंकल्प मांडला आहे. विकासाच्या बाबतील दादांनी कधीही तडजोड केली नाही. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचा दादांचा संकल्प होता. त्यावर आता महायुती सरकार काम करेल. लाडकी बहीण योजना बंद होईल असे आरोप होत असताना दादांनी त्यासाठी तरतूद केली आणि ही योजना कायम सुरू राहील याची काळजी घेतली.

### अल्पवयीन मुलांचे लैंगिक शोषण?

न्यायालयाने याची पुष्टी केली आहे. दरम्यान, अविमुक्तेश्वरानंद यांनी सांगितले की, रामभद्राचार्य यांचे शिष्य मुकुंदानंद यांनी खटला दाखल केला आहे. ते इतिहासलेखक आहेत. आम्ही तपासात सहकार्य करू. सत्य बाहेर येईल. यापूर्वी, पोक्सो न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयांचा हवाला दिला. त्यात म्हटले आहे की प्रत्येक प्रकरणात एफआयआर दाखल करणे अनिवार्य नाही. एफआयआर मागवायचा की तक्रारीचा पाठपुरावा करायचा हे ठरवण्यासाठी दंडाधिकाऱ्यांनी त्यांच्या विवेकबुद्धीचा वापर करावा. जर पोलिस तपास आवश्यक असेल तर एफआयआर दाखल करून चौकशी करणे योग्य आहे.
न्यायालयाने म्हटले आहे की आरोप हा एक गंभीर आणि दखलपात्र गुन्हा आहे आणि पोक्सो कायदा लागू होतो. पुरावे गोळा करण्यासाठी पोलिस तपास आवश्यक आहे. केवळ खासगी तक्रार म्हणून खटला चालवणे योग्य होणार नाही.
न्यायाधीशांनी संबंधित पोलिस स्टेशनच्या प्रभारींनी तात्काळ एफआयआर नोंदवावा आणि कायद्यानुसार स्वतंत्र आणि निष्पक्ष तपास करावा असे आदेश दिले. पोक्सो कायद्यातील तरतुदींचे पालन केले पाहिजे. पीडितांची ओळख आणि प्रतिष्ठा जपली पाहिजे. तपास अहवाल न्यायालयात सादर केला पाहिजे.
लैंगिक शोषणाचा खटला खोटा सिद्ध होईल
लैंगिक शोषणाचा खटला खोटा सिद्ध होईल. हा एक बनावट खटला आहे. तो (आशुतोष महाराज) रामभद्राचार्यांचा शिष्य आहे. तो इतिहासलेखक आहे. त्याने यापूर्वीही लोकांवर खोटे खटले दाखल केले आहेत. तो लोकांना धमकावतो आणि पैसे उकळतो. रामभद्राचार्यांशी आमचे सतत शाब्दिक युद्ध सुरू आहे. सर्वांना हे माहित आहे. त्याने आपल्या शिष्याचा वापर करून आमच्याविरुद्ध खोटा खटला दाखल केला आहे. तो इच्छितो की आपण गायींच्या बचावासाठी सरकारविरुद्ध आवाज उठवणे थांबवावे. म्हणूनच आपल्यासोबत हे सर्व घडत आहे.
– शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद सरस्वती

# डॉर्फ केटल जंगल कप व मँगो कपमुळे गावागावात हरित क्रांती

## महाराष्ट्रातील पहिली वृक्ष लागवड स्पर्धा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** महाराष्ट्रातील पर्यावरण संवर्धन आणि ग्रामीण शाश्वत विकासाच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल ठरत असलेल्या डॉर्फ केटल जंगल कप आणि मँगो कप या राज्यातील पहिल्या वृक्ष लागवड स्पर्धांमुळे गावागावात हरित चळवळ उभी राहत असून या उपक्रमाला अभूतपूर्व यश मिळत असल्याची माहिती डॉर्फ केटल केमिकल्स इंडिया लिमिटेडकंपनीचे सीएसआर हेड श्री. संतोष जगधने, यांनी पत्रकार परिषदेत देण्यात आली.




डॉर्फ केटल केमिकल्स इंडिया लिमिटेड यांच्या सीएसआर उपक्रमांतर्गत, सप्रेम व नवदृष्टी यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या पत्रकार परिषदेत कंपनीचे सीएसआर हेड श्री. संतोष जगधने, सप्रेम संस्थेचे सामाजिक कार्यकर्ते डॉ. प्रकाश गायकवाड आणि प्रकल्प समन्वयक हिमांशु लोहकरे यांनी संयुक्तपणे माहिती दिली.या स्पर्धेत आतापर्यंत राज्या तील ५ जिल्ह्यांमधील तब्बल २३० गावांनी सक्रिय सहभाग नोंदवला आहे. त्यापैकी १४० गावांमध्ये मियावाकी पद्धतीने घनदाट जंगल निर्मितीचे प्रकल्प यशस्वीपणे उभारण्यात आले आहेत, तर ४९ गावांमध्ये सुमारे १,५०,००० केशर आंबा वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे केवळ वृक्ष लागवडच नव्हे तर ग्रामीण भागात पर्यावरणाबाबत जागरूकता, संवेदनशीलता आणि स्वयंस्फूर्ती निर्माण होत आहे.

या स्पर्धेच्या माध्यमातून अनेक गावांनी पर्यावरणपूरक आणि नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत. शेंडेवाडी येथील जलतलाव प्रकल्प, प्लास्टिकमुक्त गाव संकल्पना, वृक्ष दिंडी, तसेच माझी वसुंधरा अभियानाशी सुसंगत उपक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत. यामुळे गावांचा पर्यावरणीय आणि सामाजिक विकास अधिक सक्षम होत आहे.

या संपूर्ण उपक्रमाला मनरेगा योजनेची जोड, डॉर्फ केटल कंपनीचा सीएसआर निधी आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त लोकसहभाग लाभत असल्याने ही चळवळ अधिक मजबूत बनत आहे. विशेष म्हणजे, मँगो कप अंतर्गत लागवड करण्यात आलेल्या केशर आंबा वृक्षांमुळे भविष्यात ग्रामस्थांना मोठ्या प्रमाणात उत्पन्नाचे साधन उपलब्ध होणार असून पर्यावरण संवर्धनासोबत आर्थिक सक्षमीकरणाचे उद्दिष्टही साध्य होणार आहे.

डॉर्फ केटल जंगल कप ही केवळ स्पर्धा नसून पर्यावरण संवर्धन, जैवविविधता वाढ आणि ग्रामीण भागात शाश्वत विकासाची लोकचळवळ बनली आहे. या उपक्रमातून आदर्श अकरा तालुके निर्माण करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला असून भविष्यात अधिक जिल्ह्यांमध्ये हा उपक्रम विस्तारण्याचे नियोजन आहे.

शासन, सामाजिक संस्था, कॉर्पोरेट क्षेत्र आणि ग्रामस्थ यांच्या संयुक्त सहभागातून सुरू झालेली ही हरित चळवळ महाराष्ट्रासाठी एक प्रेरणादायी मॉडेल ठरत असून, येत्या काळात संपूर्ण देशासाठीही हा उपक्रम आदर्श ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला

## निधन वार्ता

### अनुसयाबाई झोडगे



**गोंडेगाव :** श्रीरामपूर तालुक्यातील गोंडेगांव अनुसयाबाई नामदेव झोडगे वय( १०१) यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात बहीण मुलगा, तिन मुली, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार असून ते गोंडेगावचे सिताराम झोडगे यांचे आई होत तर अमोल व गणेश थोरात यांचा आजी होत.

### प्रयागाबाई कदम



**गोंडेगाव:** श्रीरामपूर तालुक्यातील गोंडेगांव येथील प्रयागाबाई दसरत कदम वय(९०)यांचे दुःखत निधन झाले. त्यांच्या पश्च्यात मुलगा, मुलगी, नातवंडे असा परिवार असून ते गोंडेगावचे प्रगतशिल शेतकरी शिवाजी कदम यांच्या आई होत तर सामाजिक कार्यकर्ते भारत कदम आजी होत.

## शेकटा येथे ग्रामपंचायतच्या वतीने २ बोअरवेलचे उद्घाटन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** तालुक्यातील शेकटा येथे ग्रामपंचायतच्या वतीने गोळेगाव रोडच्या वस्त्यांसाठी २ बोअरवेल देऊन याचे उद्घाटन युवा सरपंच शिवम जाधव, उपसरपंच कय्युम शेख, ग्रामपंचायत सदस्य भाऊसाहेब गायकवाड यांच्या शुभहस्ते करण्यात आले

अनेक वर्षांपासूनचा गोळेगाव रस्त्यालगत असलेल्या वस्त्यांवरील पाण्याचा प्रश्न आज खऱ्या अर्थाने पूर्ण होणार असुन उर्वरित असलेल्या वस्त्यांसाठी अजून २ बोअरवेलची तरतूद ग्रामपंचायत मार्फत करण्यात येईल असे आश्वासन सरपंच शिवम जाधव यांनी दिले.

याप्रसंगी उपस्थित असलेले सरपंच शिवम जाधव, उपसरपंच कय्युम शेख, ग्रामपंचायत सदस्य भाऊसाहेब गायकवाड, प्रगतशील शेतकरी गणी पटेल, कापूस व्यापारी सजन शेख, सरदार पटेल, कासमभाई पटेल, शायर पटेल, अलीम पटेल, रईस पटेल, रावसाहेब शिंदे, संजय गायकवाड, अनिल जाधव, नूरभाई पठाण, कदीर पठाण, अमोल शिंदे, समद पठाण, आयुब पठाण व शेकटा येथील ग्रामस्थ मोठ्या संखने उपस्थित होते.



## 'पहल'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांकडून सामाजिक एकोप्याचा संदेश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** तालुक्यातील सिद्धनाथ वाडगाव येथील श्री स्वामी विवेकानंद इंग्रजी स्कूलचे 'पहल' या संकल्पनेवर आधारित वार्षिक स्नेहसंमेलन बुधवारी (दि. १८ फेब्रुवारी) उत्साहात पार पडले. यंदा मनोरंजनात्मक कार्यक्रमांना फाटा देत सामाजिक जाणीवा व मूल्यामधिष्ठित विषयांवर आधारित सादरीकरण करण्यात आले.

'पहल म्हणजे एक नवी सुरुवात' असा संदेश देणाऱ्या बॅनरडे कार्यक्रमाची दिशा स्पष्ट करण्यात आली. विद्यार्थ्यांनी छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य, आई-वडिलांप्रती कृतज्ञता, शिक्षकांचा आदर, एकलव्याची जिद्द, भारतीय सैनिकांची यशोगाथा, सावित्रीबाई फुले यांचे कार्य, कॉन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे महत्त्व, शेतकरी आत्महत्येचा प्रश्न, सोशल मीडियाचे दुष्परिणाम, अन्नाचे महत्त्व तसेच क्रीडाक्षेत्रातील नैपुण्य अशा विविध विषयांवर प्रभावी सादरीकरण केले.

विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून सामाजिक एकोप्याचा आणि सकारात्मक बदलाचा संदेश देण्यात आला. पालकांनीही केवळ मनोरंजनावर भर न देता प्रेरणादायी



गीतांवर सादरीकरण करून समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष वाल्मिक सिरसाठ, माजी शिक्षणाधिकारी एम. के. देशमुख, भाऊसाहेब तुपे, वाल्मिक सुरासे, नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्या सविता जाधव, नगरसेविका पल्लवी सिरसाठ आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे अध्यक्ष डॉ. आबासाहेब सिरसाठ, सचिव प्रमोद महाजन तसेच शिक्षिका भाग्यश्री नरोडे, वंदना चव्हाण, पूजा राजपूत, सुरेखा हिवाळे, शीतल नरोडे, सोनाली लबडे, प्रियंका कळवणे, कांचन गायकवाड, वैष्णवी चव्हाण, श्वेता बत्तीसे, कोमल काकडे तसेच शिक्षक दत्तू कळवणे, रविराज थोरात, योगेश देवबोणे, शिवनाथ चव्हाण, गजानन राऊत आदींनी परिश्रम घेतले.

## दत्त गिरी महाराज यांचे दातृत्व; अपघातग्रस्त तरुणीसाठी मानधन अर्पण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** संगमनेर तालुक्यातील झरेकाठी येथील आकांक्षा रवींद्र निकम ही तरुणी अहिल्यानगर येथे झालेल्या अपघातात गंभीर जखमी झाली असून तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने उपचाराचा मोठा खर्च पेलणे कुटुंबास कठीण ठरत आहे.

ही बाब समजताच दत्त गिरी महाराज यांनी पुढाकार घेत आपल्या कीर्तनातून मिळालेले संपूर्ण मानधन उपचारासाठी देण्याचा निर्णय घेतला. रविवारी झालेल्या कीर्तनानंतर त्यांनी ही रक्कम पत्रकार सोमनाथ डोळे यांच्याकडे सुपूर्द केली, जेणेकरून ती तातडीने निकम कुटुंबापर्यंत पोहोचवता येईल.महाराजांच्या या मदतीमुळे कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे. आकांक्षाची प्रकृती अद्याप चिंताजनक असून पुढील उपचारांसाठी अधिक निधीची आवश्यकता आहे. दानशूर व्यक्ती व सामाजिक संस्थांनी मदतीसाठी पुढे यावे, असे आवाहन कुटुंबीयांनी केले आहे. महाराजांच्या या कृतीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## नागपुरात आंतरराज्यीय मोबाईल चोरी टोळीचा पर्दाफाश दहा आरोपी अटकेत, चाळीस मोबाईल जप्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नागपूर:-** शहरात कार्यरत असलेल्या आंतरराज्यीय मोबाईल चोरी करणाऱ्या टोळीचा घरफोडी विरोधी पथकाने पर्दाफाश करत दहा आरोपींना अटक केली आहे. त्यांच्या ताब्यातून विविध कंपन्यांचे एकूण ४० अँड्रॉईड मोबाईल फोन जप्त करण्यात आले असून त्यांची अंदाजे किंमत १२ लाख ११ हजार रुपये इतकी आहे.



गिट्टीखदान पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा क्रमांक ८८ / २९२५, कलम ३०३ (दोन) भा. दं. सं. अंतर्गत ही कारवाई करण्यात आली. फिर्यादी संतोष बंशी गवरे (वय ३१ वर्षे, रा. कोराडी नाका, गिट्टीखदान, नागपूर) यांच्या मोबाईल चोरी प्रकरणाचा तपास सुरू असताना घरफोडी विरोधी पथकातील पोलीस कर्मचारी प्रविण रोडे यांना गोपनीय माहिती मिळाली की, आंतरराज्यीय मोबाईल चोरी करणारी टोळी नागपूर शहरात आली असून शांती मोहल्ला, यशोधरा नगर परिसरात भाड्याने रूम घेऊन राहत आहे.

प्राप्त माहितीच्या आधारे पथकाने सापळा रचून कारवाई केली असता संशयित १० आरोपी ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून जप्त मोबाईलमध्ये व्हिवो, ओप्पो, ॲपलसह विविध कंपन्यांचे फोन मिळाले. चौकशीत आरोपींनी नागपूर शहर, नागपूर ग्रामीण, यवतमाळ, भंडारा, वाशीम, नांदेड आदी जिल्ह्यांतून मोबाईल चोरी केल्याची कबुली दिली आहे.

जप्त मोबाईलपैकी एक मोबाईल फिर्यादी संतोष गवरे यांचा असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींना न्यायालयात हजर केले असता दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजूर करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र कुमार सिंगल, सह पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) वसंत परदेशी, पोलीस उपायुक्त राहुल माकणीकर (डिटेक्शन), सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) डॉ. अभिजीत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली घरफोडी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप चंदन, सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन चुलपार, पोलीस उपनिरीक्षक नितीन तिवारी, पोलीस हवालदार गणेश बरडे, प्रशांत गभणे,पो.ह.प्रवीण रोडे, श्रीकांत डुके,राकेश ठाकूर, पो.ना.अमन राजत,सुधीर पवार आदींनी केली.

नागपूर पोलिसांच्या या कारवाईमुळे शहरात कार्यरत आंतरराज्यीय मोबाईल चोरी टोळीचा मोठा भांडाफोड झाला असून नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

## लिनेसच्या मैथिली शाखेच्या अध्यक्षपदी डॉ. मीनल फुलवर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** लिनेस क्लबच्या मैथिली शाखेच्या अध्यक्षपदी डॉ. मीनल फुलवर, सचिवपदी माधुरी सोनवणे तर खजिनदारपदी श्रद्धा मिरीकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण व शपथविधी सोहळा नुकताच उत्साहात पार पडला.

सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्षा अनुराधा आदिक होत्या. प्रमुख पाहुण्या म्हणून नगरसेविका तथा महिला बालकल्याण समितीच्या सभापती मंजुश्री मुरकुटे उपस्थित होत्या. उद्घाटन अधिकारी डॉ. वर्षा झंवर व पदग्रहण अधिकारी नीलम परदेशी यांनी पदाधिकाऱ्यांना शपथ दिली. स्वागतगीत, गणेश वंदना, ध्वजवंदना व विश्वशांती गीत सादर करण्यात आले. प्रास्ताविकात माधुरी सोनवणे यांनी यंदाचा समारंभ 'उडान' या थीमवर आधारित असल्याचे सांगत समाजसेवेची भरारी घेण्याचा निर्धार व्यक्त केला. मावळत्या अध्यक्षांनी वार्षिक अहवाल सादर केला. कार्यक्रमात प्लास्टिकमुक्त उपक्रम राबवून हरित उडानचा संदेश देण्यात आला. नूतन अध्यक्षा डॉ. फुलवर यांनी महिला सशक्तीकरण, युवा विकास, आरोग्य जनजागृती व पर्यावरण संवर्धन या उपक्रमांवर भर देणार असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन श्वेता गोधा यांनी केले तर आभार श्रद्धा मिरीकर यांनी मानले.

# माझी वसुंधरा अभियान ५.०'मध्ये बारामती नगरपरिषद राज्यात प्रथम



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** बारामती नगरपरिषद यांनी 'माझी वसुंधरा अभियान ५.०' अंतर्गत राज्यस्तरीय स्पर्धेत ४० हजार ते १ लाख लोकसंख्या गटात प्रथम क्रमांक पटकावला. सलग दुसऱ्या वर्षी हा मानाचा पुरस्कार मिळाल्याने शहरात समाधान व्यक्त होत आहे. यापूर्वी 'माझी वसुंधरा अभियान ४.०'मध्येही नगरपरिषद अव्वल ठरली होती.

भूमी, जल, वायु, अग्नी व आकाश या पंचतत्त्वांवर आधारित स्पर्धेत पर्यावरण संवर्धन, संरक्षण व जतनासाठी राबविण्यात आलेल्या नियोजनबद्ध उपक्रमांची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली. शहर स्वच्छता, हरित उपक्रम, जलसंधारण आणि जनजागृती मोहिमा यामुळे हा मान मिळाल्याचे सांगण्यात आले.पुरस्कार वितरण सोहळा सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम येथे पार पडला. राज्यपाल आचार्य देवव्रत, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर तसेच मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. नगराध्यक्ष सचिन सातव, उपनगराध्यक्ष श्वेता नाळे, मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्यासह पदाधिकारी व कर्मचाऱ्यांनी पुरस्कार स्वीकारला. या यशाबद्दल नगरपरिषद प्रशासनाने नागरिकांचे आभार मानत .पर्यावरणपूरक उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार व्यक्त केला.

**पुरस्कार केवळ नगरपरिषदेचा नाही, तर संपूर्ण बारामतीकरांचा आहे. आदरणीय अजितदादांनी पाहिलेल्या स्वच्छ व पर्यावरणपूरक बारामतीच्या स्वप्नाला साकार करण्याच्या दिशेने आपण एक महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. पुढील काळातही हे यश टिकवून ठेवत बारामतीला राज्यातच नव्हे तर देशातही आदर्श शहर बनविण्याचा आमचा प्रयत्न राहील.**

**सचिन सदाशिव सातव,**
**नगराध्यक्ष, बारामती नगरपरिषद**

**'माझी वसुंधरा अभियान ४.०' आणि '५.०' मध्ये सलग मिळालेला हा प्रथम क्रमांक म्हणजे सातत्यपूर्ण नियोजन, काटेकोर अंमलबजावणी आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागाचे फलित आहे. पर्यावरण संवर्धनाची ही चळवळ अधिक व्यापक करत पुढील सर्व स्पर्धांमध्येही सर्वोत्तम कामगिरी करण्याचा आमचा निर्धार आहे.**

**पंकज भुसे,**
**मुख्याधिकारी, बारामती नगरपरिषद,**

## नशिबाची परिक्षा

**सोमवार दि . २३ फेब्रुवारी २०२६**

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १९० १४५ ११८ | ०-४ | १५६ २४८ ४५६ | जोड ०५-१४-३९ ७६-४८ |

### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १२९ ४८० ६६० | २-५ | १४० १५९ ११३ | जोड २६-८५-६३-९०-५४ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १३० १४९ ४०० | ४-७ | १२४ १७९ १६० | जोड ४१-६७-५८-०२-७९ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

## द • ख • ल

### संत अमरगिरी महाराजांचे पाचवे पुण्यस्मरण भक्तिभावात संपन्न



**कोपरगाव** : आत्मा मालिक ध्यान योग मिशन यांच्या वतीने हृदयनिवासी १००८ प.पू. संत अमरगिरीजी महाराज यांचे पाचवे पुण्यस्मरण रविवार, २२ फेब्रुवारी २०२६ (फाल्गुन शुद्ध पंचमी) रोजी अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडले. पहाटे अभिषेक, पादुका पूजन व प्रातः आरती करण्यात आली. त्यानंतर सकाळी हवन विधी, तर प्रतिमा पूजन व नवनाथ विधी संपन्न झाला. वारकरी रत्न ह.भ.प. बाळासाहेबजी महाराज (गतीर, इगतपुरी) यांच्या कीर्तन सेवेमुळे परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. सकाळी ११ ते १२ या वेळेत श्रद्धांजली, ध्यान पुष्प अर्पण करून मध्यान्ह आरती झाली. दुपारी १२ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. या पुण्यस्मरण सोहळ्याच्या निमित्ताने ध्यान योग मिशनचे अध्यक्ष आदरणीय संत परमानंद महाराज यांनी हृदयनिवासी १००८ प.पू. संत अमरगिरीजी महाराज यांच्या जीवनकार्याचा सविस्तर परिचय उपस्थितांना करून दिला. त्यांनी संत अमरगिरीजी महाराजांनी दिलेल्या आध्यात्मिक मार्गदर्शनाचे महत्त्व आणि समाजासाठी केलेल्या कार्यावर प्रकाश टाकला.

### महानगरपालिका कर्मचारी पतसंस्थेकडून मयत सभासदांचे पाच लाखांचे कर्ज निवारण

**अहिल्यानगर** : नगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळाची बैठक चेअरमन विजय कोतकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत पाच मयत सभासदांचे प्रत्येकी एक लाख रुपये प्रमाणे एकूण पाच लाख रुपयांचे कर्ज निवारण निधीतून माफ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. कै. सोमनाथ गायकवाड, कै. वैशाली जाधव, कै. बाबासाहेब कोतकर, कै. सुभाष साठे व कै. लास अवघडे या सभासदांचे कर्ज माफ करण्यात आले. विषय संचालक सतीश ताठे यांनी मांडला तर बाळासाहेब गंगेकर यांनी अनुमोदन दिले. निर्णयामुळे संबंधित कुटुंबियांना मोठा दिलासा मिळाला आहे. सभासदांचे हित आणि सामाजिक बांधिलकी हेच आमचे ध्येय, असे प्रतिपादन करत कोतकर यांनी संस्थेची सभासदकेंद्रित भूमिका अधोरेखित केली.

### मातोश्री उद्यान येथे तपोवनेश्वर महादेव मंदिराची स्थापना



**अहिल्यानगर** : विनायक नगर मातोश्री उद्यान येथे तपोवनेश्वर महादेव मंदिराची स्थापना धार्मिक वातावरणात मोठ्या उत्साहात संपन्न झाली. तीन दिवस चाललेल्या विधींमध्ये अनुप भणगे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली पूजन, होम-हवन, कलशरोहन व पिंड स्थापना करण्यात आली. महादेव पिंडाची स्थापना आदित्यनाथजी महाराज यांच्या हस्ते झाली, तर महाआरती संग्राम जगताप यांच्या हस्ते पार पडली. यावेळी बोलताना आमदार जगताप म्हणाले, धार्मिकतेतून सुसंस्कृत समाजाची दिशा निर्माण होते. शहराच्या विकासाबरोबर अध्यात्मिक विकासही आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. गणेश भोसले यांनी परिसराच्या विकासासाठी घेतलेल्या पुढाकाराचा उल्लेख करून हे मंदिर चांगल्या विचारांचे उगमस्थान ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमास भगवान फुलसौंदर, प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, मीनाताई चोपडा आदी मान्यवरांसह नागरिकांची मोठी उपस्थिती होती. महाप्रसाद वाटपाने सोहळ्याची सांगता झाली.

# वडगाव गुप्ता येथे भव्य क्रिकेट स्पर्धेचा समारोप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : छत्रपतींच्या जयंतीचे औचित्य साधत वडगाव गुप्ता येथे आयोजित करण्यात आलेल्या संघर्ष योद्धा मराठा प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचा उत्साहात समारोप झाला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रेरणेने ग्रामस्थांनी पारंपरिक ध्वनीप्रदूषणाला फाटा देत युवकांना खेळाच्या मैदानावर एकत्र आणण्याचा स्तुत्य उपक्रम राबविला. स्पर्धेत सुमारे पाचशेहून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला. अंतिम सामन्यात तुळशी क्रिकेट संघ व चिश्तिया क्रिकेट संघ यांच्यात अटीतटीची लढत झाली. रोमांचक सामन्यात तुळशी संघाने विजेतेपद पटकावत एक लाख रुपयांचे रोख पारितोषिक व बुलेट दुचाकी मिळविली. हा सन्मान जालिंदर कदम यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

द्वितीय क्रमांकासाठी एकाहत्तर हजार रुपये, तृतीय क्रमांकासाठी एकावन्न हजार रुपये तर चतुर्थ क्रमांकासाठी एकतीस हजार रुपयांची पारितोषिके देण्यात आली. वैयक्तिक पुरस्कारांमध्ये सुजित परभणे यांना सामनावीर,




प्रवीण दानवे यांना उत्कृष्ट गोलंदाज, सोमनाथ पवार यांना उत्कृष्ट क्षेत्ररक्षक, तर अक्षय जराड यांना मालिकावीर व उत्कृष्ट फलंदाज पुरस्कार देण्यात आला.

समारोपप्रसंगी बोलताना जालिंदर कदम यांनी खेळातून शिस्त, संघभावना व नेतृत्वगुण विकसित होतात, असे प्रतिपादन केले. सर्व समाजघटकांतील युवकांनी एकत्र येत क्रीडामैत्रीचा संदेश दिला. निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी दृकश्राव्य नियंत्रण प्रणालीद्वारे तिसरा पंच व्यवस्था लागू करण्यात आली होती. कार्यक्रमास परिसरातील मान्यवर, ग्रामस्थ, महिला व युवकांची मोठी उपस्थिती होती.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील तरुणांसमोर सकारात्मक आदर्श निर्माण झाला असून अशी स्पर्धा दरवर्षी आयोजित करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## ‘शिव पाणंद शेत रस्ता मंत्रालय’ स्थापन करण्याची मागणी; जंगले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव** : शेतकऱ्यांच्या वहिवाट व शिव-पानंद रस्त्यांचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी स्वतंत्र शिव पाणंद शेत रस्ता मंत्रालय स्थापन करावे, अशी मागणी शिवपानंद शेत रस्ते चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. यासंदर्भातील सविस्तर निवेदन त्यांनी पाठविले असून, बळीराजा शासन निर्णय प्रभावीपणे राबविण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. निवेदनात म्हटले आहे की, शेतकऱ्यांच्या शेतीपर्यंत जाणारे रस्ते हे त्यांच्या उपजीविकेचा व सन्मानाचा प्रश्न आहे. भारतीय राज्यघटनेतील समानतेचा व जीवनाच्या हक्काचा आधार घेत हा विषय तातडीने सोडविणे आवश्यक आहे. वहिवाट रस्त्यांशी संबंधित प्रकरणे वर्षानुवर्षे न्यायालयात प्रलंबित राहत असल्याने ती महसूल विभागाकडे वर्ग करून निश्चित कालमर्यादेत निकाली काढावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. रस्ते खुला करताना कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मोफत पोलीस बंदोबस्ताची कायमस्वरूपी तरतूद करावी, नकाशावरील शासकीय रस्त्यांच्या प्रकरणांसाठी विशेष यंत्रणा स्थापन करावी व सीमांकन प्रक्रियेत दगडी खांब, क्रमांक खुणा आणि डिजिटल नोंदी अनिवार्य कराव्यात, असेही निवेदनात नमूद आहे. सीमा चिन्हांशी छेडछाड करणाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्याची तरतूद करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अतिक्रमण करणाऱ्यांवर कठोर कारवाई, संबंधित अनुदाने स्थगित करणे, तसेच भूमी अभिलेख विभागासाठी अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे जंगले पाटील यांनी स्पष्ट केले. राज्यस्तरीय विशेष मोहीम, ऑनलाइन तक्रार प्रणाली आणि ग्रामस्तरावर जबाबदारी निश्चितीची अंमलबजावणी करण्याची मागणीही करण्यात आली आहे. शासनाने सकारात्मक निर्णय न घेतल्यास शेतकरी लोकशाही मार्गाने टप्प्याटप्प्याने आंदोलन उभारतील, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

# समाजाची लुबाडणूक करणाऱ्याचे भले होत नाही : कापरे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव** : जीवनात मिळालेल्या संधीचा सोने करून आपल्या जीवनाचा उध्दार करून घ्या शिक्षणामध्ये मोठी ताकद असुन शिक्षणामुळे माणुस घडतो समाजातील सर्वसामान्यच्या अडीअडचणीत मदत करणे यापेक्षा मोठे काम कुठलेच नसुन कुठलेही सामाजिक काम करताना पक्ष हा निमित्त असतो ज्यांना काम करण्याची इच्छा असते ती व्यक्ती सत्तेविनाही कुठलेही काम करू शकते. प्रापंचिक सुखासाठी पैसा लागतो पण तो चांगल्या नितीने कमवलेला असावा. कष्ट न करता मिळालेल्या पैशांची जाणीव राहत नाही.

समाजाची लुबाडणूक करणा-याचे कधीही भले होत नसते डॉ मिलिंद कांबळे यांनी गोरगरीब गरजुना आरोग्य सेवा मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले



असे प्रतिपादन पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन अहिल्यानगरचे विश्वस्त वसंतराव कापरे यांनी बोलताना व्यक्त केले. सामनगांव ता. शेवगांव येथील शेवगांव पंचायत समितीचे आरोग्य विस्तार अधिकारी डॉ मिलिंद कांबळे ३३ वर्षाच्या प्रदिर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्याबद्दल आयोजित सेवापुर्ती सत्कार कार्यक्रमा प्रसंगी वसंतराव कापरे बोलत होते.

यावेळी अरूण मुंढे,बबन भुसारी, सुधाकर लांडे, अंबादास कळमकर, बाळासाहेब कोळगे, सागर फडके,अँड अविनाश मगरे ,डॉ निरज लांडे, वाय डी कोल्हे, गणेश कराड, रामभाऊ साळवे, आरोग्य संघटनेचे गोरक्ष शेळके, योगेद्र पालवे, संभाजी आव्हाड, गणेश चने आदी उपस्थित होते. श्री कापरे पुढे बोलताना म्हणाले की कुठल्याही मोठ्या पदावर असताना कामे करणे ही आपली नैतिक जबाबदारी असते परंतु केलेली कामे मदत भविष्यात लोक विसरून जातात राजकारणात व समाजकारणात बरेचशे जण आपली पोळी भाजून घेतात प्रत्येक गोष्टीत वाईट शोधण्याची सवय माणसाला झाली असुन कोरोनाने माणसाला जगायला शिकविले त्यासाठी आयुष्य सुंदरपणे जगा असे त्यांनी बोलताना सांगितले.

सत्कारमुर्ती डॉ मिलिंद कांबळे बोलताना म्हणाले की देव हा माणसामध्ये असुन आपल्या चांगल्या केलेल्या कामाची पावती समाज आपल्याला देत असतो सेवानिवृत्ती नंतर आपल्या गावचे आपण काहीतरी देणे लागतो हा उदात्त हेतु डोळ्यासमोर ठेवून मी भविष्यात काम करणार असल्याचे कांबळे यांनी बोलताना सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन कल्याण मुटकुळे यांनी केले.

## कर्जतच्या ७५ ग्रामपंचायतीच्या विद्यमान सरपंच बसणार प्रशासकपदी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत** : तालुक्यातील मुदत संपलेल्या आणि निवडणूक प्रक्रिया लांबणीवर पडलेल्या ७५ ग्रामपंचायतीवर आता मागील सरपंचच प्रशासक म्हणून काम पाहणार आहेत. शासनाच्या नूतन अध्यादेशाने ग्रामीण भागातील रखडलेला विकास पुन्हा नव्याने धावण्यास मदत मिळणार आहे. मात्र संबंधित ग्रामपंचायतीवर विद्यमान सरपंचाची प्रशासक म्हणून नियुक्ती ही सहा महिन्यांच्या कालावधीसाठी असेल किंवा ग्रामपंचायतीच्या निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत राहणार आहे.

आजमितीस कर्जत तालुक्यातील ७५ ग्रामपंचायतीवर प्रशासक म्हणून शासकीय अधिकारी कार्यरत आहे. यात मागील एक-दोन वर्षात मुदत संपलेल्या २१ ग्रामपंचायती असून १ जानेवारी २०२६ नंतर मुदत संपलेल्या तब्बल ५४ ग्रामपंचायत असल्याची माहिती कर्जतचे गटविकास अधिकारी अजिंक्य सुर्यवंशी यांनी दिली. प्रशासक कार्यरत असल्याने अनेक प्रशासक अधिकाऱ्यांवर एक किंवा त्या पेक्षा अधिक ग्रामपंचायतीचा कारभार असल्याने विकास कामांसाठी मोठ्या मर्यादा पडत असल्याचे निदर्शनास आल्याने नुकताच राज्य सरकारने यासाठी एक अध्यादेश काढत मागील सरपंचच त्या संबंधित ग्रामपंचायतीचा प्रशासक राहील असा आदेश पारीत केल्याने गावपातळीवर पुन्हा मागील पदाधिकाऱ्यांनाच संधी मिळाली आहे. मात्र ही सरपंच प्रशासक नियुक्ती सहा महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा ग्रामपंचायत स्थापनेची निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी असेल त्या कालावधीसाठी पर्यंत बंधनकारक राहणार आहे.

यासह पंचायतीचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी विद्यमान उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांची प्रशासकीय समिती देखील मागीलच राहणार असल्याचे सूचना या नूतन अध्यादेशात नमूद केले आहे. कर्जत तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्वपूर्ण असलेल्या ग्रामपंचायती या निवडणुका विना विकासकामापासून वंचित राहत असल्याने ग्रामीण पातळीवर या निर्णयाचे स्वागत होत आहे.

## महामार्गालगतच्या अतिक्रमणांवर कारवाई न झाल्यास आमरण उपोषण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड** : शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८डी लगत झालेल्या अतिक्रमणांवर व रस्त्याच्या कामातील अनियमिततेवर प्रशासनाने ठोस कारवाई न केल्याने २४ फेब्रुवारी २०२६ पासून तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येणार असल्याची घोषणा सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार यांनी केली आहे. यासंदर्भात निवासी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे महामार्गालगत पक्की अतिक्रमणे, रस्त्याच्या कामातील निकृष्ट दर्जा, नोंदीतील संभाव्य फेरफार तसेच वीज खांबांमुळे निर्माण झालेली धोकादायक परिस्थिती याबाबत यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात आली होती. १५ दिवसांत कार्यवाही न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता.

मात्र अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याचे पवार यांनी सांगितले. महामार्गालगतच्या सर्व अतिक्रमणांवर निष्पक्ष कारवाई करावी, रस्त्याच्या कामाची स्वतंत्र तांत्रिक चौकशी करावी, नोंदींची



सखोल पडताळणी करून दोषींवर कारवाई करावी, वीज खांबांबाबत तातडीने सुरक्षिततेची उपाययोजना करावी आणि वाहतूक कोंडीची समस्या मार्गी लावावी, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

महामार्गाचा प्रश्न सार्वजनिक सुरक्षितता व प्रशासनाच्या पारदर्शकतेशी संबंधित असल्याचे सांगत प्रशासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# कोंभळी येथे शिवजयंती उत्साहात

## विविध सामाजिक उपक्रम



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**मिरजगाव** : कर्जत तालुक्यातील कोंभळी येथे अखंड हिंदुस्थानचे आराध्यदैवत, हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती गुरुवारी, दि.१९ फेब्रुवारी मोठ्या उत्साहात आणि विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरी करण्यात आली. यावेळी मुख्य चौकात सकाळी ९ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्यदिव्य अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत प्रतिमेचे पूजन करून उपस्थित मान्यवरांनी अभिवादन केले.

दरम्यान, सकाळी शालेय विद्यार्थ्यांच्या सहभागाने मिरवणूक काढण्यात आली. ढोलताशांचा गजर, लेझीम पथके, टाळ मृदंगाचा निनाद आणि छत्रपती शिवाजी महाराज की जय, 'जय भवानी... जय शिवाजी'च्या गगनभेदी जयघोषात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती अत्यंत उत्साह आणि भगवेमय वातावरणात पार पडली. या भव्य मिरवणूकीमध्ये पारंपारिक ऐतिहासिक वेशभूषा करून घोड्यावर स्वार झालेली शिवप्रेमी विद्यार्थी - विद्यार्थीनींनी सहभाग घेतला होता. शिवजयंतीनिमित्त कोंभळी येथील समस्त ग्रामस्थ व माजी सरपंच दिपक गांगर्डे यांच्या संयुक्त विद्यमाने जयंती उत्सव निमित्ताने इ.पाचवी ते इ.दहावीच्या व इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेवून सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**‘जय भवानी, जय शिवाजी’ चा जयघोष !**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त कोंभळीत सकाळी निघालेल्या मिरवणूकीत हातात भगवे झेंडे, गळ्यात भगवे गमच्छे घालून शिवभक्त मोठ्या उत्साहीने सहभागी झाले होते. यावेळी 'जय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रपर गीताचे गायन, पोवाडा सादर करण्यात आला. तसेच सायंकाळी महिला व विद्यार्थ्यांकरिता रांगोळी स्पर्धा व संगीत खुर्ची, लिंबू चमचा यांसह विविध स्पर्धा घेण्यात आले होत्या. या कार्यक्रमासाठी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांसह गावातील तरूण मंडळी व समस्त ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिपक गांगर्डे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य महान आहे. तरुणांनी महाराजांच्या विचारांचे अनुकरण केले पाहिजे. सध्याच्या काळात हे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले.

## उन्हाची तीव्रता वाढली

## घोड - कुकडी आवर्तन वेळेत सोडण्याची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव** : तालुक्यात उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून सकाळी दहानंतर कडक ऊन जाणवू लागले आहे. सायंकाळी पाचपर्यंत उष्णतेची लाट कायम राहत असल्याने यंदाचा उन्हाळा खडतर ठरण्याची चिन्हे आहेत.

या पार्श्वभूमीवर उन्हाळी हंगामातील पिकांसाठी घोड डॅम व कुकडी डॅम येथून आवर्तने वेळेत सोडावीत, अशी मागणी श्रीगोंदा तालुक्यातील शेतकऱ्यांकडून होत आहे. उन्हाची तीव्रता वाढल्याने विहिरी व कूपनलिकांतील पाण्याचे बाष्पीभवन सुरू झाले आहे. खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांनी यंदा कांदा व गव्हाची मोठ्या प्रमाणावर लागवड केली आहे. कांदा हे नगदी पीक असल्याने त्यातून आर्थिक दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. मात्र वेळेत पाणी न मिळाल्यास पिकांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे.

शेतकऱ्यांच्या मते, घोडचे आवर्तन तुलनेने वेळेत सोडले जाते; मात्र कुकडीचे आवर्तन वारंवार विलंबाने येते. पिके जळाल्यानंतर पाणी सोडले जाते, असा अनुभव असल्याने नाराजी व्यक्त होत आहे. दरवर्षी पाणी नियोजनावरून वाद निर्माण होऊन आंदोलनाची वेळ येते. त्यामुळे जलसंपदा विभागाने योग्य नियोजन करून वेळेत आवर्तने जाहीर करावीत, अशी मागणी होत आहे.

पाण्याच्या हस्तांतरणाबाबत वाढीव क्षेत्र दाखवून पाणीपट्टी आकारली जात असल्याची तक्रारही शेतकऱ्यांनी केली असून, हा निर्णय आर्थिकदृष्ट्या परवडणारा नसल्याची भावना व्यक्त करण्यात आली आहे.

## एमआयडीसीतील गुन्हेगारीवर थेट कारवाईचा इशारा

### उद्योग क्षेत्र भयमुक्त करण्याचा निर्धार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : एमआयडीसी परिसरातील खंडणी, दहशत आणि धमकावण्याच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर पावले उचलली जाणार असल्याची स्पष्ट भूमिका पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी मांडली. आमी संघटनेच्या बैठकीत बोलताना गोळ्या-टॅबलेटने उपयोग नसेल तर थेट ऑपरेशन करावे लागेल, असा इशारा देत गुन्हेगारांना थेट कारवाईचा संदेश दिला. बैठकीत काही उद्योगपतींनी एका खंडणीखोर व्यक्तीकडून होत असलेल्या त्रासाची माहिती दिली. संबंधिताने उद्योगात येऊन कामकाज ठप्प केले तसेच रात्री घरी जाऊन कुटुंबीयांना धमकावल्याचा आरोप करण्यात आला. या घटनेची दखल घेत पोलिसांनी तातडीने कारवाई करून आरोपीला ताब्यात घेतले असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. धमकीची भाषा आणि दबाव अजिबात सहन केला जाणार नाही.

झिरो टॉलरन्स हीच आमची भूमिका आहे, असे घार्गे यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ‘कायद्याने ठोका’ या भूमिकेचा उल्लेख करत त्यांनी कायदा सर्वांसाठी समान असल्याचे सांगितले. उद्योगपतींनी भीती न बाळगता तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहनही त्यांनी केले. औद्योगिक वसाहतीत दारू, जुगार, ड्रग्ज व इतर बेकायदेशीर प्रकारांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येणार असून तक्रारींसाठी स्वतंत्र पेटी बसविण्याचा निर्णय घेण्यात आला. दरमहा आढावा बैठक घेऊन परिस्थिती नियंत्रणात ठेवली जाईल, असेही सांगण्यात आले. आमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ यांनी उद्योजकांवरील अन्याय खपवून घेतला जाणार नसल्याचे सांगितले. उपाध्यक्ष संजय बंदिष्टी यांनीही उद्योग सुरक्षित ठेवण्यासाठी कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचा निर्धार व्यक्त केला. बैठकीस पोलीस अधिकारी व मोठ्या संख्येने उद्योजक उपस्थित होते.

द • ख • ल

## स्किल डेव्हलपमेंट सेंटर, कारेगाव येथे शिवजयंती उत्साहात

**कवठे येमाई :** महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती १९ फेब्रुवारी रोजी राज्यभर उत्साहात साजरी करण्यात आली. शिरूर तालुक्यातील कारेगाव येथील स्किल डेव्हलपमेंट सेंटरमध्येही शिवजयंती मोठ्या उत्साहात पार पडली.



कार्यक्रमाची सुरुवात शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या शौर्य, पराक्रम आणि स्वराज्य स्थापनेवरील प्रभावी वक्तृत्व सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच काही विद्यार्थ्यांनी गीत गायन सादर करत वातावरणात उत्साह निर्माण केला.

केंद्र संचालक संजय पारडे यांनी विद्यार्थ्यांना शिवाजी महाराजांच्या आदर्शांचे पालन करून राष्ट्रनिर्मितीत योगदान देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास सिनिअर एक्झिक्युटिव्ह देवकीनंदन शेटे, केंद्रातील सदस्य व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण रानमाळे यांनी केले, तर आभार केंद्रप्रमुख श्रीनिवास माने यांनी मानले. शेवटी 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## ओसीएच्या चार कॅडेट्सची भारतीय वायुदलात निवड



**देशसेवेचा आकडा १०७५ वर**

**वाघोली (केसनंद), पुणे :** वाघोली (केसनंद) येथील ऑफिसर करिअर अकॅडमीच्या (जउअ) चार कॅडेट्सनी भारतीय वायुदल निवड प्रक्रियेतील सर्व टप्पे यशस्वीरीत्या पूर्ण करत वैद्यकीय चाचणीही उत्तीर्ण केली आहे. लवकरच हे कॅडेट्स प्रशिक्षणासाठी रवाना होणार असून देशसेवेसाठी रुजू होणार आहेत.

ओसीएमधून संरक्षण दलात कार्यरत अधिकारी, कमांडो व सैनिकांची संख्या आता १०७५ वर पोहोचली आहे. त्यामुळे संस्थेच्या कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. संरक्षण सेवेत करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये ओसीए डिफेन्स फॅक्टरी म्हणून ओळखली जाते. येथे अनुभवी माजी सैनिकांकडून मार्गदर्शन व प्रशिक्षण दिले जाते.

ही अकॅडमी एअर फोर्स व्हेटरन डॉ. अमित कुमार दुबे यांनी स्थापन केली आहे. त्यांनी सुमारे २० वर्षे भारतीय वायुदल मध्ये सेवा बजावत १९९९ मधील कारगिल युद्ध काळात राष्ट्रसेवेत योगदान दिले आहे. कठोर सैनिकी शिस्त, चारित्र्यनिर्मिती आणि नेतृत्वगुणांच्या विकासावर संस्थेचा भर आहे.

निवड झालेल्या कॅडेट्समध्ये ओम खिरसागर, आदित्य, साईराज तस्तुते आणि ओंकार साळुंखे यांचा समावेश आहे. त्यांच्या यशाबद्दल संस्थेतर्फे अभिनंदन करण्यात आले आहे.

## पणदरे येथे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

**सोमेश्वरनगर :** नव महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय पणदरे येथे मेरा युवा भारत पुणे, युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय, भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या.

स्पर्धांमध्ये कबड्डी, खो-खो, १०० मीटर धावणे व गोळा फेक या क्रीडा प्रकारांचा समावेश होता. जिल्ह्यातील विविध शाळा व महाविद्यालयांतील खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून उत्कृष्ट कामगिरी केली. सर्व स्पर्धा नियोजित नियमांनुसार शिस्तबद्ध वातावरणात पार पडल्या.

क्रीडा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, संघभावना, शिस्त व आत्मविश्वास वाढीस लागतो. स्पर्धेचे नियोजन व आयोजन सुयोग्य पद्धतीने करण्यात आले होते.

यावेळी मेरा युवा भारत पुणे जिल्हा युवा अधिकारी आशिष शेटे, मेरा युवा भारत पुणे जिल्हा कार्यालय प्रतिनिधी स्वप्निल शिंदे, नव महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय पणदरे प्राचार्य काळे, पर्यवेक्षक मनोज वाघ, शिक्षक श्री. दरेकर, शिक्षक श्री गावडे तसेच इतर शिक्षक उपस्थित होते.




# ढगाळ हवामानामुळे पुणे जिल्ह्यात कांद्याला मोठा फटका

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लोणी धामणी :** पुणे जिल्ह्यातील उत्तर भागातील खेड, आंबेगाव, जुन्नर आणि शिरूर तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना सध्या ढगाळ हवामानामुळे मोठा फटका बसत आहे. मागील आठवड्यात राज्यातील काही भागात पावसाने हजेरी लावली आहे, त्यामुळे कांद्यावर बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव लक्षणीय वाढला आहे.



मावा आणि करपा यांसारख्या रोगांमुळे कांद्याच्या पाती पिवळी पडत आहेत, तर काही झाडांना पिळ लागण्याची समस्या दिसत आहे. महागडी रोपे खरेदी करून लागवड केलेल्या कांद्याचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना महागडी औषधे खरेदी करून फवारणी करावी लागत आहे; अन्यथा उत्पादनावर नकारात्मक परिणाम होण्याची भीती सतावत आहे.

ढगाळ वातावरणाचा फटका फक्त कांद्यावरच नाही तर द्राक्ष उत्पादन पट्ट्यातही जाणवतो. शेतकऱ्यांच्या मते, बुरशीजन्य रोगांमुळे पात पिवळी पडल्याने द्राक्षाची वाढ मंदावते आणि फळांचा आकार लहान होण्याची शक्यता अधिक असते.

शेतकऱ्यांनी हवामान परिस्थिती लक्षात घेऊन योग्य काळजी घेणे गरजेचे आहे. योग्य वेळेत फवारणी आणि रोग व्यवस्थापन केले नाही तर उत्पादनावर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो, असा अंदाज शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे.

## ॲड. संजय सावंत यांची वकील पॅनलवर कायदेशीर सल्लागार पदी निवड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कवठे यमाई :** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (चडएउङ) वकील पॅनलवर ॲड. संजय दत्तात्रय सावंत यांची कायदेशीर सल्लागार पदी निवड करण्यात आली आहे. महावितरणने ठरवलेल्या अटी व नियमांची पूर्तता त्यांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांद्वारे सिद्ध केली. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कागदपत्रांची पडताळणी केली आणि त्यांच्या अनेक वर्षांच्या अनुभवाचा विचार करून निवड निश्चित केली.



ॲड. सावंत यांनी पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक, जगदंब सामाजिक प्रतिष्ठान, येसूबाई सामाजिक प्रतिष्ठान येथे चार वर्षांहून अधिक काळ कायदेशीर सल्लागार म्हणून काम केले आहे. तसेच पुणे जिल्हा व सत्र न्यायालयातील पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणात मोफत कायदेशीर सल्लागार म्हणूनही कार्यरत आहेत.पुणे विभागाचे अधिकारी लीगल ॲडव्हायजर (ख/उ) नितल हसे यांनी ॲड. सावंत यांना निवडीचे अधिकृत पत्र दिले. निवडीच्या पत्रानंतर ॲड. सावंत यांनी चडएउङ संचालक राजेंद्र पवार, वरिष्ठ अधिकारी (उङअ) आर.आर. गांधी, पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता सुनिल, असिस्टंट लॉ ऑफिसर दिनकर तिडके आणि पुणे विभाग महावितरण कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाचे आभार व्यक्त केले

## संत निरंकारी मिशनच्या वतीने आळंदीत विशाल स्वच्छता अभियान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** सेवा हीच साधना आणि निसर्गसंवर्धन हा जीवनमूल्य ठरवत संत निरंकारी मिशनच्या वतीने 'प्रोजेक्ट अमृत' अंतर्गत 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' या अभियानाच्या चौथ्या टप्प्याचे आयोजन रविवारी सकाळी ८ ते ११ दरम्यान देशभर एकाच वेळी करण्यात आले. परम श्रद्धेय सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज एवं निरंकारी राजपिता जी यांच्या पावन मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. पुणे शहरासह जिल्ह्यातील विविध भागांत मोठ्या उत्साहात सहभाग नोंदविण्यात आला.



या मोहिमेअंतर्गत पुणे जिल्ह्यातील आळंदी येथील इंद्रायणी नदी घाट परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, नगरसेवक सोमनाथ कुऱ्हाडे, गोविंद कुऱ्हाडे, दिनेश घुले, सचिन गिलबिले, सागर कुऱ्हाडे यांच्यासह मिशनचे सेवादार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संत निरंकारी मंडळाचे नंदकुमार झांबरे यांनी माहिती देताना सांगितले की, देशभरातील सुमारे १६०० हून अधिक ठिकाणी आणि पुण्यात ४२ ठिकाणी हा उपक्रम एकाच वेळी पार पडला. पाणी हे केवळ नैसर्गिक साधन नसून जीवनाचा मूलाधार व ईश्वराची अमूल्य देणगी आहे. त्याचे संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे नैतिक कर्तव्य आहे. या उपक्रमातून अधोरेखित करण्यात आला. 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' ही केवळ मोहीम नसून सेवाभाव, संस्कार आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश देणारी चळवळ असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## चौधरवाडी शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोमेश्वरनगर :** बारामती तालुक्यातील चौधरवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यंदाचा कार्यक्रम शालेय इतिहासात प्रथमच अधिक दिमाखदार स्वरूपात साजरा झाल्याने ग्रामस्थांमध्ये विशेष उत्साह दिसून आला.



कार्यक्रमासाठी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष चंद्रकांत पापळ, मुख्याध्यापिका एस. बी. बालगुडे व एस. एस. खामकर यांनी विशेष परिश्रम घेतले. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. चौधरवाडीचे लोकनियुक्त सरपंच शशांक पवार यांच्या हस्ते नारळ फोडून कार्यक्रमाचे उद्घाटन झाले.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. 'दमलेल्या बाबांची कहाणी' या गीतावर भावनिक वातावरण निर्माण झाले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वेशभूषेतील बालचमू विशेष आकर्षण ठरले. तसेच अजित पवार यांच्यावरील गीताने उपस्थितांमध्ये उत्साह संचारला.

यावेळी सरपंच शशांक पवार, उपसरपंच राहुल चौधरी, दीपक पवार, कालिदास गरुड, मुख्याध्यापिका एस. बी. बालगुडे, एस. एस. खामकर, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष चंद्रकांत पापळ तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दादांचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी ठाम पाठिंबा : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** बारामती नगरपरिषदेला माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत ४० हजार ते १ लाख लोकसंख्या गटात राज्यात प्रथम क्रमांक मिळाला आहे. सलग दुसऱ्या वर्षी पर्यावरण क्षेत्रात बारामतीने अव्वल स्थान पटकावले आहे. यापूर्वी माझी वसुंधरा अभियान ४.० मध्येही बारामती प्रथम क्रमांकावर होती.



भूमी, जल, वायु, अग्नी व आकाश या पंचतत्त्वांवर आधारित राज्यस्तरीय स्पर्धेत मिळालेला हा पुरस्कार बारामतीच्या नियोजनबद्ध कामगिरीची व नागरिकांच्या सहभागाची पावती मानली जात आहे.

पुरस्कार स्वीकृतीनंतर नगरपरिषदेचे पदाधिकारी व सदस्यांनी देवगिरी येथे जाऊन दिवंगत अजित पवार यांच्या प्रतिमेसमोर हा सन्मान समर्पित केला. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार उपस्थित होत्या.

मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सांगितले की, पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, पाणी व्यवस्थापन, कचरा प्रक्रिया व हरित उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन केले. सलग दोन वर्षे मिळालेला क्रमांक हा बारामतीच्या एकजुटीचा सन्मान आहे. पर्यावरणपूरक विकासाचा मार्ग अधिक ताकदीने पुढे नेऊ. स्वप्न पूर्ण करण्यासाठी मी ठामपणे तुमच्या पाठीशी आहे, असे त्यांनी सांगितले. या प्रसंगी उपस्थितांमध्ये नवचैतन्य व पुढील वाटचालीचा निर्धार दिसून आला.

## वडजादेवी यात्रोत्सवात विविध कार्यक्रमांचे आयोजन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लोणी धामणी (ता. आंबेगाव) :** ग्रामदैवत आई वडजादेवी यात्रोत्सव निमित्त येथे विविध सांस्कृतिक आणि क्रीडा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

बुधवार (दि. २५) रोजी सकाळी ७ ते ८ वाजता देवीस हारतुरे, मांडव डहाळे येथे सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत बैलगाड्यांच्या भव्य शर्यती होणार आहेत. रात्री ९ ते ११ वाजता छबिना व पालखी मिरवणूक आणि त्यानंतर विठ्ठल कृपा कला नाट्य मंडळाचा भजनी भारुडाचा कार्यक्रम राहणार आहे.

गुरुवार (दि. २६) रोजी सकाळी ८ ते ५ वाजेपर्यंत बैलगाड्यांच्या शर्यती, सायंकाळी ५ ते ७ वाजेपर्यंत शेरणी वाटप, आणि रात्री ९ नंतर रघुवीर खेडकर व कांताबाई सातारकर यांचा लोकनाट्य तमाशाचा कार्यक्रम आयोजित केला आहे.

बैलगाडा शर्यतीसाठी एकूण इनाम रक्कम २,९७,५०१ असून, यावेळी घोड्यांच्या शर्यती देखील संपन्न होणार आहेत.

## बारामतीत घरफोडी आरोपी अटकेत चोरीची सामग्री जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बारामती:** बारामती तालुक्यातील सूर्यनगरी परिसरात दोन घरफोड्यांचे प्रकरण समोर आले आहे. ११ जानेवारी दुपारी आणि ७ फेब्रुवारी सायंकाळी घडलेल्या घटनांमध्ये सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम लंपास झाली.

७ फेब्रुवारी रोजी सूर्यनगरीतील एक घरफोडी झाल्यानंतर घरातील कपाट उघडे असून सोन्याचे मिनी गंठन (१७.५ ग्रॅम), सोन्याचे काप (८ ग्रॅम), एअररिंग (४ ग्रॅम), दोन सोन्याच्या अंगठ्या (६ ग्रॅम), चांदीचे पैंजण आणि अंदाजे १० हजार रुपये रोख रक्कम गायब झाल्याचे नोंदले गेले. या घरातील एकूण चोरीचे मूल्य सुमारे २ लाख १ हजार रुपये आहे.

दुसऱ्या घरात सुरेंद्र वामनराव चव्हाण यांच्या घरी सुमन रेसिडेन्सी फ्लॅट, सूर्यनगरी, बारामती येथे ३५ हजार रुपये रोख रक्कम चोरी झाली.तपासादरम्यान पोलिसांनी तांदुळवाडी (ता. बारामती) येथून ऋषिकेश विजय कोकाटे (२१, रा.अंबिका नगर, इंदापूर) याला ताब्यात घेतले. न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. चौकशीत आरोपीने चोरीची कबुली दिली आणि चोरीतील सोन्याचे दागिने सोनार श्रेयस विठ्ठल कुलथे (२५, रा.व्यंकटेश नगर, इंदापूर) याला दिल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी त्यालाही अटक केली आहे.



ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव आणि बारामती तालुका पोलीस स्टेशनचे पोलिस अमलदार यांनी केली.पोलिसांनी गुन्हे दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे, तसेच चोरीची इतर संभाव्य कनेक्शन तपासण्याचे काम सुरू आहे.

# माझी वसुंधरा अभियानात सासवड नगरपरिषदेचा राज्यात गौरव

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नाझरे सुपे :** सासवड नगरपरिषदेने स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात पुन्हा एकदा राज्याचे लक्ष वेधून घेतले आहे. मागील वर्षीच्या 'माझी वसुंधरा अभियान ४.०' अंतर्गत २५ ते ५० हजार लोकसंख्या गटात सासवड नगरपरिषदेने राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला असून, शनिवारी (ता. २१) मुंबईत झालेल्या दिमाखदार सोहळ्यात या गौरवावर अधिकृत शिक्कामोर्तब करण्यात आले.




सासवड नगरपरिषदच्या वतीने पुरस्कार स्वीकारल्यानंतर माजी आमदार संजय जगताप, मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप व इतर नगरसेवक-नगरसेविका उपस्थित.

पर्यावरण व हवामान बदल मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते सासवड नगरपरिषदेला हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. गतवर्षीच्या या अभियानात राज्यातील तब्बल २२ हजार ६३२ स्थानिक स्वराज्य संस्था सहभागी झाल्या होत्या. या चुरशीच्या स्पर्धेत सासवडने आपल्या उत्कृष्ट नियोजनाच्या जोरावर ३ कोटी रुपयांचे रोख बक्षीस आणि सन्मानचिन्ह प्राप्त केले आहे. मागील वर्षी प्रशासकीय राजवट असल्याने या पुरस्कारांचे वितरण यावर्षी मोठ्या उत्साहात पार पडले.

मुंबईतील या गौरव सोहळ्याला माजी आमदार संजय जगताप, मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप यांसह नगरसेवक ज्ञानेश्वर जगताप, प्रदीप राऊत, ज्ञानेश्वर गिरमे, सोपान रणपिसे, मयूर चौखंडे, नगरसेविका प्रियांका जगताप, लिना वढणे, स्मिता जगताप, अर्चना जगताप, माजी उपनगराध्यक्ष सुहास लांडगे, विजय वढणे, संदीप राऊत, साकेत जगताप, सौरभ वढणे, सुहास जगताप, तुषार जगताप, हिरामण हिवरकर आणि शहर स्वच्छता समन्वयक राम कारंडे यांनी उपस्थित राहून सासवडचा हा बहुमान स्वीकारला.

सासवड नगरपरिषदेने गेल्या काही वर्षांत राबविलेले अभिनव उपक्रम या यशाचे मुख्य कारण ठरले आहेत. शहरात केलेले मोठ्या प्रमाणावरील वृक्षारोपण, शास्त्रशुद्ध कचरा व्यवस्थापन आणि सौर ऊर्जेचा प्रभावी वापर या त्रिसूत्रीमुळे सासवडने राज्य स्तरावर आपला ठसा उमटवला आहे. या यशामुळे संपूर्ण पुरंदर तालुक्यातून नगरपरिषदेचे कौतुक होत आहे.

# वाणेवाडीत कराटे स्पर्धा उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोमेश्वरनगर :** बारामती तालुक्यातील वाणेवाडी येथे कराटे स्पर्धा उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात पार पडल्या. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, शारीरिक तंदुरुस्ती आणि क्रीडाभावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

**विविध गटांतील विजेते पुढीलप्रमाणे :**
**यलो बेल्ट:** शिवांश गायकवाड, प्रत्युष हुंबरे, प्रणिल हुंबरेम
**ऑरेंज बेल्ट:** इंद्राश काकडे, निश्वा काकडे
**ग्रीन बेल्ट:** युग चव्हाण, दिव्यांश कारंडे, अन्विका कारंडे, कार्तिकी कारंडे ब्लू बेल्ट: पेक्षा वायाळ, विशीत बाविसकर, सोहम वायाळ, सर्वज्ञ वायाळ
**पर्पल बेल्ट (सेकंड):** वरदराज निलाखे



स्पर्धेचे उद्घाटन न्यू इंग्लिश स्कूल, वाणेवाडीचे मुख्याध्यापक मानसिंग जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी चीफ मास्टर धनंजय भोसले, सुनील भोसले, विक्रम भोसले, अशोक भोसले, विक्रम जगताप व अनिल यादव उपस्थित होते.

संस्थेचे ग्रँडमास्टर प्रकाश रासकर यांनी कराटे हे स्वसंरक्षणाबरोबरच व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपयुक्त असल्याचे सांगितले. शिस्त, आत्मविश्वास व मानसिक बळ वाढविण्यासाठी कराटेचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. स्पर्धेपूर्वी ब्लॅक बेल्ट मास्टर तन्वी रणवरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्पर्धेत सोमेश्वरसह बारामती परिसरातील मुला-मुलींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

स्पर्धेत खुशी आतार, सोम्या खटावकर, समृद्धी कारंडे, श्रावणी कुदळे, सियोन गायकवाड, शारोन गायकवाड, श्रेयांश जाधव, आर्या जाधव, कादंबरी थोपटे, ग्रीष्मा बाविसकर, गिरीजा नवाथे, स्वराज भोसले, आर्यन थेऊरकर यांनी सहभाग घेतला. विजेत्या व सहभागी विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. पालकांनी विद्यार्थ्यांच्या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त करत आयोजकांचे कौतुक केले.

द-ख-ल




## रेल्वे स्थानकावरही 'अहिल्यानगर' चे फलक

**अहिल्यानगर :** अहमदनगर शहराचे नामांतर ३१ मे २०२३ रोजी अधिकृतरीत्या अहिल्यानगर असे करण्यात आले होते. त्यानंतर प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण होत गेली आणि अखेर २०२५ च्या शेवटच्या तिमाहीत रेल्वे स्थानकाचे नामांतरही अधिकृतरीत्या करण्यात आले. जानेवारी २०२६ मध्ये रेल्वे स्थानक व प्लॅटफॉर्मवरील सर्व फलकांवर अहिल्यानगर हे नाव झळकू लागले आहे.

या ऐतिहासिक क्षणाचे स्वागत करण्यासाठी अहिल्यानगर जिल्हा प्रवासी संघटनेच्या सदस्यांनी रेल्वे स्थानकावर एकत्र येत नव्या नामफलकास पुष्पहार अर्पण केले. यावेळी जिल्हा प्रवासी संघटनेचे सदस्य हरजीतसिंग वधवा, रेल्वे बोर्डचे अध्यक्ष सुद्र महाजन, रेल्वे बोर्डचे जिल्हाध्यक्ष अनिल सबलोक, अशोक कानेडे, बाळासाहेब गायकवाड, संदेश रपारिया, साहेबराव विधाते, अनिरुध्द पुरकर आदी उपस्थित होते.

## प्रवरा पब्लिक स्कूलच्या माजी विद्यार्थ्याचा दुबईत गौरव



**प्रवरानगर :** लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा पब्लिक स्कूलचे माजी विद्यार्थी डॉ. रोहन बाळासाहेब अंबाडे यांना दुबई येथे 'इनोव्हेशन इन एज्युकेशन' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. वर्ल्ड एज्युकेशन समितितर्फे आयोजित समारंभात २०२६ सालचा हा बहुमान प्रदान करण्यात आला.

जगभरातील पाच हजारांहून अधिक संशोधकांमधून कठोर निवड प्रक्रियेनंतर अंबाडे यांची निवड करण्यात आली. सध्या ते खलिफा युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी येथे संशोधन वैज्ञानिक म्हणून कार्यरत असून पदार्थ विज्ञान व शाश्वत तंत्रज्ञान क्षेत्रात कार्य करत आहेत.

त्यांच्या यशाबद्दल राधाकृष्ण विखे पाटील, शालिनीताई विखे पाटील यांच्यासह संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले. अंबाडे यांचे यश विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## पिपाडा परिवाराचे वतीने शिवजयंती साजरी



**शिर्डी :** छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, दूरदृष्टी आणि लोकाभिमुख राज्यकारभार आजच्या पिढीसाठी आदर्श असल्याची भावना प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ.ममता पिपाडा यांनी बोलताना व्यक्त केली. प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्षा ममता पिपाडा यांनी आज हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी भाजपाचे नेते डॉ.राजेंद्र पिपाडा,आरपीआयचे दिलीपराव वाघमारे,प्रगतशील शेतकरी शिवाजीराव आनप, मदनलालजी पिपाडा,महावीरजी पिपाडा,निखील पिपाडा आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

## सायमन भारस्कर यांना 'कलावंत दादासाहेब फाळके' व 'सह्याद्री रत्न' पुरस्कार



**भेंडा :** स्वराज्य फिल्म प्रोडक्शन संघटना, महाराष्ट्र राज्य व आंतरराष्ट्रीय मानवी अधिकार न्यायिक सुरक्षा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य पुरस्कार सोहळ्यात नेवासा तालुक्यातील तरवडी येथील साहित्यिक व अभिनेते सायमन भारस्कर यांना 'कलावंत दादासाहेब फाळके पुरस्कार' तसेच 'सह्याद्री रत्न पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. हा सोहळा दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी आचार्य अत्रे सभागृह, पिंपरी चिंचवड येथे उत्साहात पार पडला.

'कलावंत दादासाहेब फाळके पुरस्कार' निर्माता-दिग्दर्शक बाळासाहेब बांगर व सहाय्यक पोलीस आयुक्त सुनील हिरुरकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला, तर 'सह्याद्री रत्न पुरस्कार' ज्येष्ठ सिनेअभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांच्या हस्ते देण्यात आला. कार्यक्रमास राहुल शिंदे (स्टार माझा), सुरेश पोखरकर, स्वराज्य फिल्म प्रोडक्शनचे अध्यक्ष गिरीश राजूरकर, डॉ. शाम जाधव, रामभाऊ आवारे, सुनील खंडागळे, निलेश खेत्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

# 'वाटा संघर्षाच्या' हा प्रेरणादायी गौरवग्रंथ : लहू कानडे

## राजेंद्र उदागे यांच्या 'वाटा संघर्षाच्या' गौरव ग्रंथाचे प्रकाशन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** शब्दगंध साहित्यिक परिषदेचे अध्यक्ष राजेंद्र उदागे यांचा 'वाटा संघर्षाच्या' हा गौरव ग्रंथ, तुम्हा आम्हा सर्वांच्या पिढीचा संघर्ष नेमकेपणाने मांडणारा दस्तऐवज आणि आपलं जगणं बुलंद होण्यासाठी प्रेरणादायी ठरणारा आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक, माजी आ लहू कानडे यांनी केले.

अहिल्यानगर येथील कल्याण रोड वरील जाधव लॉन्स येथे शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने आयोजित अध्यक्ष राजेंद्र उदागे यांच्या 'वाटा संघर्षाच्या' या गौरव ग्रंथाच्या प्रकाशन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बापूसाहेब भोसले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास अहिल्यानगरचे आ. संग्राम जगताप, नगरसेवक संपत बारस्कर, अध्यक्ष राजेंद्र उदागे, मिरा उदागे, डॉ. संजय कळमकर, प्रा. डॉ. सुधाकर शेलार, प्रा.डॉ. संदीप सांगळे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कॉ. बाबा आरगडे, प्रा. मधुसूदन मुळे, जयंत येलुलकर, नगरसेविका मयुरीताई जाधव, बुलढाणा जिल्हा परिषदेचे माजी सभापती अशोकराव पडघन, जयंत जाधव, उद्योजक भारत सातपुते, प्राचार्य डॉ. जी. पी. ढाकणे, शब्दगंधचे संस्थापक, सचिव सुनील गोसावी, खजिनदार भगवान राऊत आदी मान्यवर यावेळी विचारपिठावर उपस्थित होते.

यावेळी बोलताना मा. आ. लहू कानडे म्हणाले की, कोणतीही दिशा नसलेल्या पाथर्डी तालुक्यातील सुसरे या एका खेडेगावातील दुष्काळग्रस्त भागातील मुलगा नगरला येऊन स्वतःची एक वेगळी दुनिया उभी करतो, ही अत्यंत गौरवाची गोष्ट आहे. या गौरव ग्रंथामध्ये त्यांनी आपल्या भूतकाळाबद्दल अत्यंत विलक्षण गोष्टी नेमकेपणाने नोंदवल्या आहेत. शब्दगंधने परिवर्तनवादी विचारांची शिदोरी देणारे मित्र आपुलकीच्या भावनेतून नेहमीच जपले आणि त्यांच्या सर्जनशीलतेला पाठबळ देण्याचे काम केले. राजेंद्र उदागे हा माणूस कुठल्याही विचारवंतापेक्षा कमी नाही असे ते म्हणाले.

आ. संग्राम जगताप म्हणाले, राजेंद्र उदागे यांचा 'वाटा संघर्षाचा' हा गौरव ग्रंथ साहित्यिक व उद्योजकांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे. त्यांनी खेडेगावातून नगरला येऊन स्वतःचा चांगला व्यवसाय उभा केला. स्वतःची जबाबदारी सांभाळली आणि शेकडो हातांना रोजगार उपलब्ध करून दिला. त्यांच्या कार्यकाळात शब्दगंध साहित्यिक परिषदेला एक वेगळी उंची मिळाली आहे. साहित्य क्षेत्रात शब्दगंध साहित्यिक परिषदेचा दबदबा निर्माण झाला आहे.

यावेळी साहित्यिक डॉ. संजय कळमकर, प्रा. डॉ. सुधाकर शेलार, प्रा. डॉ. संदीप सांगळे, ज्ञानदेव पांडुळे, अशोक पडघन, प्रा. मधुसूदन मुळे, बाळासाहेब बोठे, जयंत येलुलकर यांचीही भाषणे झाली. शब्दगंधचे संस्थापक सचिव सुनील गोसावी यांनी प्रास्ताविक केले. खजिनदार भगवान राऊत यांनी मान्यवरांचे स्वागत केले. शर्मिला गोसावी व उद्धव काळापहाड यांनी सूत्रसंचालन केले, तर अमोल उदागे यांनी आभार मानले.

## म.फु.कृ.विद्यापीठाचे भाजीपाला संशोधन केंद्र

# उत्कृष्ट केंद्र पुरस्काराने सन्मानित



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** भाजीपाला संशोधन संस्थेची ४४ वी वार्षिक गट बैठक कोंडा लक्ष्मण तेलंगणा राज्य फलोत्पादन विद्यापीठ, हैदराबाद येथे पार पडली. याप्रसंगी महात्मा फुले कृषी विद्यापीठतील उद्यान विद्या विभागांतर्गत असलेल्या अखिल भारतीय समन्वित भाजीपाला पिके संशोधन प्रकल्पास उत्कृष्ट केंद्र पुरस्कार- २०२५ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. उद्यानविद्या विभाग प्रमुख तथा वरिष्ठ भाजीपाला पैदासकार डॉ. बी. टी. पाटील, कनिष्ठ भाजीपाला पैदासकार डॉ. शर्मिला शिंदे, कनिष्ठ रोगशास्त्रज्ञ प्रा. चिमाजी बाचकर, कनिष्ठ कीटकशास्त्रज्ञ डॉ. शालिग्राम गांगुर्डे यांनी मान्यवरांच्या हस्ते सदरचा पुरस्कार स्वीकारला. हैदराबाद मधील राजेंद्रनगर येथील फलोत्पादन महाविद्यालयात संपन्न झालेल्या या बैठकीप्रसंगी तेलंगणा उद्यानविद्या विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजीजी रेड्डी, तेलंगणा राज्याचे सचिव सुरेश कुमार मोहन, भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली येथील सहाय्यक महासंचालक (फळ व भाजीपाला पिके) डॉ. सुधाकर पांडे, तेलंगण उद्यानविद्या विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. लक्ष्मी नारायण व इतर मान्यवर उपस्थित होते.

कृषी विद्यापीठ राहुरी येथील भाजीपाला संशोधन प्रकल्पाच्या स्थापनेपासून आजपर्यंत ४० हून अधिक भाजीपाला पिकांचे सुधारित व संकरित वाण विकसित करण्यात आली असून त्यापैकी अनेक वाणांना केंद्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. विविध भाजीपाला पिकांबाबत शेतकरी हिताच्या महत्त्वपूर्ण १२० शिफारशी प्रसारित करण्यात आल्या आहेत तसेच अनेक संशोधनात्मक लेख प्रकाशित करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे भाजीपाला पिकांच्या १५ वाणांची पी.पी.व्ही. एफ. आर. ए. मध्ये नोंदणी करण्यात आली आहे. याशिवाय २५ पेक्षा अधिक जणूकांचे एन. बी. पी. जी. आर., नवी दिल्ली येथे जतन करण्यात आले आहे.

एकंदरीत मागील पाच वर्षाच्या भाजीपाला प्रकल्पाच्या उत्कृष्ट कामगिरीच्या आधारावर या प्रकल्पास उत्कृष्ट संशोधन केंद्र या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याबद्दल महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे,संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, अधिष्ठाता डॉ.साताप्पा खरबडे यांनी भाजीपाला प्रकल्पातील सर्व शास्त्रज्ञ, अधिकारी व कर्मचारी ज्यांचे यामध्ये मोलाचे योगदान लाभले त्या सर्वांचे या पुरस्काराबद्दल अभिनंदन केले आहे. या वार्षिक बैठकीसाठी देशभरातून सुमारे ३५० शास्त्रज्ञ उपस्थित होते.

# युवतींनी मोबाईलचा वापर जपून करावा : शिरसाठ



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगांव :** आजच्या मोबाईलच्या युगात युवतींनी मोबाईलचा वापर जपून करावा कुणालाही वैयक्तिक व्यक्तीला नंबर देऊ नये विद्यार्थिनींची छेडछाड ,मोबाईल मध्ये फोटो काढणे ,पाठलाग करणे अशा कुठल्याही प्रकारच्या आमिषाला बळी न पडता अभ्यासावर लक्ष केंद्रित करणे मुलींनी आई-वडिलांची मान खाली जाऊ न देणे याबाबत जागरूक राहण्याचा सल्ला निर्भय -कन्या पथक प्रमुख पोलीस कॉन्स्टेबल प्रियंका शिरसाट यांनी बोलताना दिला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे ,व त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ढोरजळगाव-ने व विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने निर्भय -कन्या अभियान कार्यशाळा संपन्न झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुनिल चोळके होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. किशोर धनवटे, मुख्य प्रशासक सचिन कर्डिले ,माध्यमिक विभागाचे प्राचार्य आशिष भारती, त्रिमूर्ती पब्लिक स्कूल प्राचार्य संजय बुधवंत ,फार्मसी कॉलेजचे प्राचार्य विनोद भोईटे उपस्थित होते.

यावेळी प्रा संदीप घोडेचोर, जयराम घोडेचोर , प्रा.प्रशांत लोखंडे प्रा. प्रदीप साळवे प्रा. आकाश वाघ प्रा. ओम घाडगे प्रा. रवी पवार, प्रशांत थोरात, रोहिणी खंडागळे, प्रियंका कर्डिले, गीता आगळे, मोनिका गरड ,अमृता राजळे ,आदिती पडवळ ,हरी मोरे, संजय सानप,नवगिरे मामा, अमोल काळे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. प्रदीप नवल यांनी केले तर सूत्रसंचालन अश्विनी केसभट आणि प्रतीक्षा वायकर यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रा. नवनाथ रकटे यांनी मानले. कार्यक्रमासाठी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# संविधाननिष्ठ कार्याचा गौरव डॉ.कांबळे यांना भावपूर्ण निरोप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अमरापुर :** शेवगाव तालुक्यातील सामनगाव येथे आरोग्य विस्तार अधिकारी डॉ. मिलिंद कांबळे यांचा सेवानिवृत्ती सोहळा उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ढोरा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ड. वसंतराव कापरे होते.

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

यावेळी अरुणभाऊ मुंडे, अंबादास कळमकर, बबनराव भुसारी, माजी रामभाऊ साळवे, डॉ. सुधाकर लांडे, नगरसेवक डॉ. नीरज लांडे, बाळासाहेब गव्हाळ, संभाजी आव्हाड, विष्णू घनवट, वाय. डी. कोल्हे, ॲड. अविनाश मगरे, झेंडे मॅडम तसेच 'शाहू-फुले-आंबेडकर-साठे-कलाम सामाजिक विचार मंच'चे संस्थापक अध्यक्ष अशोक शिंदे आदींनी मनोगत व्यक्त केले.

डॉ. कांबळे यांचे कार्यालयीन व सामाजिक कार्य संविधाननिष्ठ असल्याचे सांगत, अधिकारी कसा असावा याचे आदर्श उदाहरण अशी भावना व्यक्त करण्यात आली.



सत्काराला उत्तर देताना डॉ. कांबळे म्हणाले, देव माणसांतच शोधावा.

अध्यक्षीय भाषणात ड. कापरे यांनी डॉ. कांबळे यांच्या कार्याची प्रशंसा करत, संधीचे सोने कसे करावे हे त्यांनी दाखवून दिले. लोकांच्या कामी येणे यापेक्षा मोठी गोष्ट नाही, असे सांगितले.

डॉ. कांबळे यांनी सेवेला प्रारंभ पारनेर येथे केला होता. विविध ठिकाणी कार्य करत शेवटी शेवगाव येथून आरोग्य विस्तार अधिकारी पदावरून ते सेवानिवृत्त झाले. कार्यक्रमास विविध मान्यवर, लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन व प्रास्ताविक कल्याणराव मुटकुळे यांनी केले.

# निलंबित स्वस्त धान्य दुकानदाराला धान्य कुणाच्या आशिर्वादाने : मा. सरपंच पवार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**जामखेड :** तालुक्यातील नान्नज येथील माजी सरपंच संतोष पवार यांनी जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले की मिळालेल्या माहितीनुसार जामखेड तालुक्यातील सोनेगाव येथील स्वस्त धान्य दुकान जिल्हा पुरवठा कार्यालय अहिल्यानगर यांच्या कडून काही कारणास्तव २९ जानेवारी २०२६ रोजी निलंबित करण्यात आले आहे.

सदरील आदेशाची प्रत तहसील कार्यालय जामखेड यांच्या कडे त्याच दिवशी ई मेल द्वारे व ४ फेब्रुवारी २०२६ रोजी टपालमधे पोहोच झालेला आहे . ४ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी पर्यंत सदरील निलंबनाच्या आदेशाला केराची टोपली दाखवून कसलीही कारवाई जामखेडचे तहसिलदार व पुरवठा निरीक्षक यांच्याकडून करण्यात आलेली नाही.

पवार स्वत: १९ फेब्रुवारी रोजी कारवाई करण्याबाबत तहसिलदार जामखेड व तालुका पुरवठा निरीक्षक जामखेड यांना विनंती अर्ज करून सदरील स्वस्त धान्य दुकानवरती निलंबनाची कारवाई करून शासकीय नियमाप्रमाणे सदरील स्वस्त धान्य दुकान दुसऱ्या स्वस्त धान्य दुकानाला जोडुन निलंबित झालेल्या स्वस्त धान्य दुकान मध्ये धान्य उतरविले जाणार नाही. याची काळजी घ्यावी अशी विनंती केली होती तरी पण २० फेब्रुवारी २०२६ रोजी शासकीय गोदाम जामखेड येथून सोनेगाव साठी जुन्याच निलंबित केलेल्या स्वस्त धान्य दुकानदार यांच्या नावाने वाहतूक पास बनवुन धान्य देण्यात आलेले आहे. हे सर्व कुणाच्या आशीर्वादाने चालू आहे हे समजले नाही. तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी स्वस्त धान्य दुकान निलंबित करून पण कायद्याच्या पळवाटा काढून भ्रष्टाचार करणाऱ्या जामखेडचे तहसिलदार तसेच पुरवठा निरीक्षक यांच्या वर कारवाई करण्यात यावी.

तक्रारी नुसार जे कोणी दोषी असतील त्यांच्या वर कठोर कारवाई करण्यात यावी तसे न झाल्यास माजी सरपंच संतोष पवार हे जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर येथे २ मार्चपासुन आमरण उपोषण करणार आहे. याबाबतची सर्व जबाबदारी प्रशासनाची राहील असा इशारा दिला आहे.

# बसस्थानकावर गर्दीचा फायदा घेत वृद्धेचे मंगळसूत्र लंपास

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** एसटी बसमधील गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्यांनी एका वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र चोरल्याची घटना श्रीगोंदा बसस्थानक परिसरात घडली आहे. याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुणे जिल्ह्यातील हडपसर येथील रहिवासी असलेल्या रक्मिणी बापू नेवसे (वय ७५ वर्षे) या २० फेब्रुवारी रोजी दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास श्रीगोंदा येथून लिंपणगावला जाण्यासाठी बसमध्ये चढल्या. जामखेड-पुणे या बसमध्ये प्रवाशांची मोठी गर्दी होती. याच गर्दीचा फायदा घेत, बसमध्ये चढताना किंवा प्रवासादरम्यान अज्ञात चोरट्याने नेवसे यांच्या गळ्यातील सोन्याचे मनिमंगळसूत्र अत्यंत शिताफीने चोरून नेले.त्यामध्ये ५५,००० रुपये किमतीचे १२ ग्रॅम वजनाचे पिवळ्या रंगाचे सोन्याचे मनिमंगळसूत्र अज्ञात चोरट्यानी चोरून नेले आहे या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार राहुल शिंदे करत आहेत. प्रवाशांनी प्रवास करताना आपल्या दागिन्यांची व मौल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# जिल्हा परिषद शाळांची दैना; अनेक शाळांच्या इमारती जीर्ण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** तालुक्यातील ग्रामीण भागातील शिक्षणाचा कणा समजल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद शाळांची अवस्था सध्या अत्यंत बिकट झाली आहे. अनेक शाळांच्या इमारती जीर्ण झाल्या असून त्या कोसळण्याच्या मार्गावर आहेत, तर काही ठिकाणी भिंतींना मोठमोठे तडे गेले आहेत. 'मुलं शाळेत पाठवायची की मृत्यूच्या दाढेत?' असा संतप्त सवाल आता पालकांकडून विचारला जात आहे.

श्रीगोंदा तालुक्यातील प्रत्येक गावातील जिल्हा परिषदेच्या शाळा कालबाह्य झाल्या आहेत ज्या ठिकाणी नवीन पिढी घडतेय त्या ठिकाणची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असल्यामुळे नागरिक संतापाची लाट उसळली जात आहे याचं प्राथमिक आजही पावसाळ्यात जीव मुठीत धरून शिक्षण

गेल्या काही दिवसांतील पावसामुळे या मोडकळीस आलेल्या इमारतींचा प्रश्न अधिकच गंभीर झाला आहे.

छतावरून पाणी गळणे, भिंती ओल्या होऊन कमकुवत होणे आणि प्लास्टर पडणे अशा घटना रोजच्याच झाल्या आहेत. काही शाळांमध्ये तर सुरक्षिततेचा उपाय म्हणून उघड्यावर किंवा समाज मंदिरात वर्ग भरवावे लागत आहेत.तालुक्यातील सर्व धोकादायक शाळांचे तात्काळ 'स्ट्रक्चरल ऑडिट' व्हावे आणि नवीन इमारतींसाठी विशेष निधी मंजूर करावा, अन्यथा श्रीगोंदा तालुक्यातील नागरिक शिक्षण विभागावर धडक मोर्चा काढण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे प्रशासनाला कधी जाग येणार याकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले आहे.

### प्रशासनाचे 'तारीख पे तारीख' धोरण

शाळा व्यवस्थापन समित्यांनी वारंवार ठराव देऊन, निवेदने सादर करूनही शिक्षण विभाग आणि बांधकाम विभाग सुस्त असल्याचे चित्र आहे. निधी नाही किंवा तांत्रिक मान्यता प्रलंबित आहे अशी गुळगुळीत उत्तरे देऊन अधिकारी आपली जबाबदारी झटकत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

### शाळेत दप्तर की जीव सांभाळायचा?

आमच्या शाळेची इमारत कधीही कोसळू शकते. प्रशासनाला अनेकदा पत्रव्यवहार केला, पण अजून कोणीही फिरकले नाही. एखादी दुर्घटना घडली तर त्याला जबाबदार कोण?त्यामुळे शाळेत दप्तर की जीव सांभाळायचा ?असा प्रश्न पालकांना पडला आहे.

### धोकादायक इमारतीमुळे घटतोय पट

श्रीगोंदा तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या पटाबाबत चर्चा केली जाते. मात्र धोकादायक इमारती असल्यानेभीतीपोटी पालक मुलांना शाळेत पाठवण्यास धजावत नाहीत. विद्यार्थी संख्येत घट होत असल्याचा आरोप केला जात आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
सोमवार, दि.२३ फेब्रुवारी २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

## गोंडेगाव-खैरी निमगाव रस्त्यावर बिबट्याला उडवले



**गोंडेगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील श्रीरामपूर पुणतांबा रोडवर असलेले गोंडेगाव जवळ चारी क्र २० जवळ रात्रीच्या ९:३० सुमारास अज्ञात वाहणाच्या उडविले त्यात बिबट्या मरण पावला आहे. अनेक दिवसापासून या परिसरात धुमाकुळ घालणारा हाच बिबट्या असू शकतो या शिवारातील व परिसरातील अनेक पाळीव कुत्रे शेळ्या व कालवडी फस्त केल्या होत्या बिबट्याच्या दहशतीमुळे रात्री शेतात पाणी भरण्यासाठी जाण्यास कोणीही धजावत नव्हते अनेक वेळा दिवसापण यांचे दर्शन होत होते सद्या या भागातील उभे असणारे पिक मका व ऊस तोडणी होत असून त्यामुळे बिबट्या थेट शेतातून रस्त्यावर आले त्यात हा रात्रीच्या वेळी अज्ञान वाहणाच्या धडकेत मृत्यु पडला. हा मृत बिबट्या पाहण्यासाठी गावातील अनेक नागरीक महिला पाहण्यासाठी गर्दी झाली होती. रात्री वनविभागाच्या कर्मचारी वनरक्षक राहुल कानडे अक्षय बडे यांनी पंचनामा केला व तो गाडीत टाकून नेला.

# अहिल्यानगर महानगरपालिकेला ११ कोटींची बक्षीसे



## माझी वसुंधरा अभियानात सलग दुसऱ्यांदा यश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** राज्य शासनाच्या माझी वसुंधरा अभियान ४.० व ५.० अंतर्गत घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत अहिल्यानगर महानगरपालिकेने सलग दोन वर्षे उल्लेखनीय कामगिरी करत एकूण ११ कोटी रुपयांची पारितोषिके मिळवली आहेत. ३ ते १० लाख लोकसंख्येच्या गटात ५.० अभियानात ५ कोटींचे तृतीय पारितोषिक, तर ४.० अभियानात ६ कोटींचे द्वितीय पारितोषिक महानगरपालिकेला प्रदान करण्यात आले. हा पुरस्कार पंकजा मुंडे यांच्या हस्ते वितरित करण्यात आला.

महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव आणि आयुक्त यशवंत डांगे यांनी हा सन्मान स्वीकारला. महानगरपालिकेने भूमी, वायू, जल, अग्नी व आकाश या पाच घटकांत विविध उपक्रम राबवून पर्यावरणपूरक विकास साधला. भूमी घटकांतर्गत देशी प्रजातींची वृक्षलागवड, कचरा संकलन व प्रक्रिया, एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकविरोधी जनजागृती करण्यात आली. वायू घटकांतर्गत हवेच्या गुणवत्तेची तपासणी, बांधकामातील राडारोडा व्यवस्थापन आणि प्रदूषण नियंत्रणासाठी मोहिमा राबविण्यात आल्या. जल घटकांत शहरातील पाणीसाठ्यांची स्वच्छता, सीना नदी पात्रातील साफसफाई, पर्जन्यजल संधारणासाठी प्रोत्साहन तसेच सार्वजनिक इमारतींचे जल लेखापरीक्षण करण्यात आले. अग्नी घटकांतर्गत एलईडी दिवे, सौर प्रकल्प उभारणी व ऊर्जा बचतीसाठी उपाययोजना राबविण्यात आल्या. आकाश घटकांतर्गत नागरिकांमध्ये हरित शपथ अभियान राबवून १ लाख ४८ हजार ८९५ नागरिकांनी वैयक्तिक शपथ घेतली, तर २००२ समूहांनी सामूहिक सहभाग नोंदविला.

आयुक्त डांगे यांनी सांगितले की, महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी, घनकचरा व्यवस्थापन विभाग व स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या परिश्रमांमुळे आणि नागरिकांच्या सक्रिय सहकार्यामुळे हे यश शक्य झाले. आगामी ६.० अभियानात प्रथम क्रमांक मिळवण्याचा निर्धार महापौरांनी व्यक्त केला असून शहर स्वच्छ, हरित व पर्यावरणपूरक करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आश्वी पोलिसांची वाळू माफियांवर कारवाई;१.५३ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील आश्वी पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध वाळू उपसा आणि वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध पोलिसांनी आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. नवनियुक्त सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांनी पदभार स्वीकारताच अवैध धंद्यांना लगाम घालण्यास सुरुवात केली असून, २१ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास केलेल्या एका कारवाईत पोलीसांनी एकूण १ लाख ५३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार शनिवार दि. २१ फेब्रुवारी रोजी पहाटे ५.१५ वाजेच्या सुमारास चिंचपूर चौफुली येथे पोलिसांनी पेट्रोलिंगदरम्यान एक संशयास्पद झेनॉन पिकअप वाहन अडवून त्याची झडती घेतली असता, त्यात विनापरवाना बेकायदेशीर रित्या भरलेला वाळूसाठा पोलिसांना मिळून आला. पोलिसांनी या कारवाईत दीड लाख रुपये किमतीचे वाहन आणि तीन हजार रुपयांची वाळू असा एकूण १ लाख ५३ हजार रुपयांचा मुद्देमाल तात्काळ ताब्यात घेतला आहे.

या प्रकरणी पोलीस हवालदार गणपत गोपाळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पिकअप चालक मयुर अंबादास वेळे (वय - २४, रा. हनुमंतगाव, ता. राहाता) आणि एका अनोळखी इसमाविरुद्ध गुन्हा रजिस्टर नंबर २९/२०२६ नुसार, भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार राजेंद्र पारथी करत आहेत.

दरम्यान पोलीस ठाण्याच्या हद्दीत अशा प्रकारचे कोणतेही अवैध वाळू तसेच गौण खनिज वाहतूक खपवून घेतली जाणार नाही आणि तस्करांना आळा घालण्यासाठी भविष्यातही विशेष मोहीम ही सुरूच राहील, असा कडक इशारा सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांनी दिला आहे. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## विठ्ठल मंदिराचे कुलूप न काढल्यास गाव बंदचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री





**राहुरी** : राहुरी तालुक्यातील वांबोरी येथील प्राचीन विठ्ठल मंदिराच्या वादावरून गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. मंदिराला लावलेले कुलूप तात्काळ न काढल्यास गाव बंद करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

विठ्ठल मंदिर बचाव समितीची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत मंदिरात भक्तांना दर्शनास अडथळा निर्माण होत असल्याचा आरोप करण्यात आला. विठ्ठल भक्तांना विठ्ठलाचे जवळून दर्शन घेता येत नसल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. तसेच मंदिर परिसरात अंत्यविधीनंतरचे विधी होत असल्याचा मुद्दा उपस्थित करत ग्रामस्थांनी आक्षेप नोंदवला.

माहेश्वरी पंचांकडून चुकीची माहिती पसरवली जात असल्याचा आरोप समितीने केला. संबंधित कागदपत्रे ग्रामस्थांसमोर सादर करत मंदिरावर माहेश्वरी पंच ट्रस्टचा कोणताही अधिकृत हक्क नसल्याचा दावा करण्यात आला.

परिस्थिती तणावपूर्ण होऊ नये यासाठी पोलीस कर्मचारी अशोक झीने व संजय राठोड बैठकीला उपस्थित होते. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून प्रश्न निकाली काढावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. या बैठकीस भगवंत मकासरे, संभाजी गडाख, सदाशिव पटारे, अविनाश घावटे, रविकिरण पटारे, विष्णू ढवळे, राजेंद्र पाटील, अजित पटारे, गोदाराम पागिरे, महेश पागिरे, भाऊ काळे, भाऊ राहणे, अक्षय बोरकर, किरण गडाख, मनोज देशमाने, महेश मोरे, अशोक पठारे, सचिन पठारे, दिनेश कुसमुडे, सत्यम मोरे, काका कुसमुडे आदी ग्रामस्थ व विठ्ठल भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, प्रशासनाच्या भूमिकेकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले असून गावातील ग्रामस्थांचे या परिस्थितीवर बारकाईने लक्ष आहे.

## संस्थानच्या शैक्षणिक संकुलात सुरक्षा गार्ड दारुच्या नशेत, सुरक्षा व्यवस्था धोक्यात

अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : साईबाबा संस्थानचे शैक्षणिक संकुल विविध समस्यांनी ग्रासले असताना काल चक्क एका सुरक्षा रक्षकाने मद्यधुंद अवस्थेत प्रवेशद्वारावर ड्युटी केल्याने मोठा चर्चेचा विषय ठरला आहे .

याबाबत संरक्षण अधिकारी रोहिदास माळी यांना सदर घटनेचे छायाचित्र व व्हिडिओ उपस्थित पालकांनी पाठवल्याने शैक्षणिक संकूलाची सुरक्षा धोक्यात आली आहे. काल दि २० फेब्रुवारी रोजी दुपारी बारा ते आठ असे ड्युटी करणारा कायम कर्मचारी हा शैक्षणिक संकुलाच्या प्रवेशद्वारावर ड्युटी करत असताना ते मध्य धुंद अवस्थेत ड्युटी करत होता . तो खुलेआम बियर पीत होता .गेटवर आत मधील बाजूस दारूच्या नशेत तर्र होऊन त्याला अति मद्यपान झाल्याने प्रसंगी खाली जमीनीवर पडत फोनवर मोबाईलवर मोठ मोठ्याने संभाषण केल्याने येणाऱ्या जाणाऱ्या पालकांच्या निदर्शनास हा प्रकार आल्याने अनेकांना त्या सुरक्षारक्षकाचा फोटो व व्हिडिओ काढण्याचा मोह आवरला नाही .

त्याचा गणवेश धुळीने माखला होता येणाऱ्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांना व पालकांनी हे दृश्य पाहून तक्रारी केल्या परंतु साई संस्थांचे सुरक्षा अधिकारी रोहिदास माळी यांनी त्याकडे दुर्लक्ष केले . त्यानंतर पालकांनी त्या वॉचमनच्या प्रातापाचे संगीतमय फोटो व व्हिडिओ त्यांचे व्हाट्सअप वर पाठवल्यानंतर त्यांना रात्री उशिरा कर्तव्य दक्षतेची आठवण होत त्यांनी संबंधित सुरक्षा विभागाकडे चौकशी करत सदर प्रकरण काय आहे मला कळवा असा जुजबी फतवा काढला आहे.

### सुरक्षा निरीक्षकाची गरज

संस्थान मधील ज्यांच्या आवाजाने परिसर घाबरतो अशा सुरक्षा निरीक्षकांना दर्शन रांगेत गुंतवून सुमारे पाच हजार संख्ये च्या अति संवेदनशील शैक्षणिक संकूलात खमक्या सुरक्षा अधिकारी नेमण्यात माळी अपयशी ठरल्याने सदर प्रकार होत आहे.
कोते गोंदकर शेळके गायके असे अधिकारी नेमल्यास शैक्षणिक संकूलात असे प्रकारांना आळा बसेल परंतू हि हिंमत माळी यांचे कडे नसल्याने सदर प्रकार घडत असल्याची चर्चा आहे.

### नशेडी मिरजकर बेवडा सबनर

मागिल काळात याच शैक्षणिक संकूलात गांजा ओढणारा सुरक्षा कर्मचारी मिरजकर याला तडकाफडकी निलंबित केले
आता या बेवडया कर्मचाऱ्यांचे निलंबन होवून दोघांना एक न्याय मिळतो की, नाही यावर संस्थानची प्रतिमा निश्चित होणार आहे .

## धनादेश न वटल्याने एकास सश्रम कारावासाची शिक्षा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : चेक न वटल्या प्रकरणी दोषी धरत नेवासा तालुक्यातील तालुक्यातील हंडीनिमगाव-सुरेशनगर येथील रमेश भगवान क्षीरसागर यास एक महिन्याची सश्रम कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे असा निकाल प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती डॉ.पी.आर. सुगांवकर यांनी दिला आहे

श्रीरामपूर येथील यशवंत नागरी सहकारी पतसंस्था शाखा नेवासा फाटा यांच्या कडून भाऊसाहेब शिवराम पवार यांनी या प्रकरणात आरोपीविरुद्ध खटला दाखल केला होता.आरोपीने दिलेला चेक बँकेत सादर केल्यानंतर तो न वटल्याचे स्पष्ट झाले.

त्यानंतर कायदेशीर नोटीस देऊन ही आरोपीने रक्कम न भरल्याने न्यायालयात खटला दाखल करण्यात आला. खटल्याची सुनावणी होऊन न्यायालयाने दोन्ही बाजूचे युक्तिवाद व कागदपत्रे तपासणीनंतर आरोपीस दोषी ठरविले तसेच एक महिन्याचा सश्रम कारावास तथा दंड रक्कम नुकसान भरपाई म्हणून आरोपीने पंचवीस हजार रुपये द्यावेत, नुकसान भरपाईचा भरणा न दिल्यास त्यास मुख्य कारावासाच्या व्यतिरिक्त एक महिन्याचा साधा कारावास भोगावा लागेल अशी शिक्षा सुनावली आहे. फिर्यादीच्या वतीने अॅड. नामदेव तुकाराम वाघ यांनी कामकाज पाहिले.

## गौण खनिज वाहतुकीत जप्त ट्रकचे ठाण्यातून 'चाक' गायब



**श्रीगोंदा :** गौण खनिज तस्करी प्रकरणात तहसील कार्यालयाने जप्त केलेल्या पिवळ्या ट्रकचे चाक थेट पोलीस ठाण्याच्या आवारातूनच चोरीला गेल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. जप्त वाहन म्हणजे पुरावा पण इथे पुराव्यालाच 'जॅक' लावून चाक काढले गेले आणि आता ती ट्रक अक्षरशः पेविंग ब्लॉक्सवर उभी असल्याचे दृश्य पाहून नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, श्रीगोंदा तालुक्यात बेकायदा गौण खनिज वाहतुकीत जप्त केलेल्या ट्रक अनेक दिवसापासून पोलीस ठाण्याच्या प्रवेशाच्या बाजूला उभा आहे यापूर्वीही संबंधित ट्रक 'गायब' करण्याचा प्रयत्न झाल्याची चर्चा होती.त्यावेळी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हाही दाखल करण्यात आला होता मात्र त्यावेळी आता ट्रक नाही तर ट्रकचे स्पार्ट चोरीला केला आहे. सुरक्षा व्यवस्थेच्या कुंपणातच जर जप्त मालमत्तेची अशी अवस्था होत असेल, तर सर्वसामान्यांच्या मालमत्तेचं काय? असा प्रश्न सर्व सामान्य नागरीकातून व्यक्त केलं जात आहे त्यामुळे श्रीगोंदा पोलीस म्हणजे दुसऱ्याला सांगे भ्रमज्ञान, स्वतः मात्र कोरडे पाषाण अशी अवस्था श्रीगोंदा पोलिसांची झाली आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे ज्या आवारात कायद्याची अंमलबजावणी व्हायला हवी, त्याच ठिकाणी पुराव्यांची उघड उघड मोडतोड होत असेल, तर ही केवळ चोरी नसून प्रशासनिक निष्काळजीपणाची पोकळी उघड करणारी घटना ठरत आहे.सदर घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा, जप्ती ही कारवाई राहणार नाही ती केवळ औपचारिकता ठरेल, अशी भीती नागरीकातून व्यक्त केली जात आहे.

## वाळू माफियांवर मध्यरात्री धाड; २० ब्रास वाळूसह हायवा जप्त



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

गंगापूर तालुक्यातील ममदापूरकानडगावनेवरगाव शिवारातील काठी अवैध वाळू उपशावर पोलिस व महसूल विभागाने संयुक्त कारवाई करत तब्बल २० ब्रास वाळू व एक हायवा वाहन जप्त केले. ही धाड दि. २१ फेब्रुवारी रोजी रात्री ११ वाजता टाकण्यात आली.

उपविभागीय पोलिस अधिकारी पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक कुमारसिंग राठोड (गंगापूर) व महसूल अधिकारी रत्नाकर पांचाळ यांच्या पथकाने ममदापूर शिवारात छापा टाकला. यावेळी अवैधरित्या उपसा करून साठवून ठेवलेली सुमारे २० ब्रास वाळू तसेच वाळू वाहतूक करणारा एक छोटा हायवा जप्त करण्यात आला. या कारवाईदरम्यान मंडळ अधिकारी श्रीनिवास गवळी, ग्राम महसूल अधिकारी ब्रिजेश पारवे, सुरेश ठेंगडे, महसूल अधिकारी रत्नाकर पांचाळ, पोलीस पाटील ,पोहेका भागवत खाडे, विठ्ठल जाधव यांच्यासह संबंधित गावातील महसूल अधिकारी उपस्थित होते. जप्त केलेली वाळू व वाहन पोलीस पाटील यांच्या ताब्यात देण्यात आले असून पुढील कारवाई सुरू आहे.

### अवैध वाळू उपसा थांबणार कधी ?

गंगापूर तालुक्यात अवैध वाळू उपशाचे प्रकार वारंवार उघड होत असून स्थानिक नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. प्रशासनाने कडक कारवाई करून वाळू माफियांना आळा घालावा, अशी मागणी होत आहे.

## शिर्डीत मौलानावर चाकू हल्ला

### आरोपीस अटक करण्याची मागणी




**शिर्डी :** राहाता येथून शिर्डीला नमाज पठणासाठी आलेल्या तरुण मौलानावर अज्ञात तिघांनी धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला करत दगडाने मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली. हल्लेखोर पसार झाले आहेत. जखमी तरुणाचे नाव दानिश नफीस चौधरी (रा. देवबंद) असे असून तो रमजान महिन्या निमित्त तरावीह नमाज पठणासाठी शिर्डीत आला होता. नमाज पठण झाल्यानंतर तो पाण्याच्या टाकीनजीक उभा असताना त्याच्यावर तीन हल्लेखोरांनी चाकूने जखमी केले तो खाली पडल्यानंतर त्या दगडाने मारण्याचा प्रयत्न केला . जखमी दानिशवर श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट संचलित रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती सूत्रांनी दिली. शिर्डी शहरात उशिरा रात्री एक धक्कादायक घटना घडली. घटनेनंतर संतप्त मुस्लिम बांधवांनी शिर्डी पोलीस ठाण्यासमोर जमाव जमवत आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली. निर्दोष मुलावर हल्ला करणाऱ्यांना तत्काळ अटक व्हावी आणि अशा घटना पुन्हा घडू नयेत अशी मागणी मुस्लिम बांधवांकडून करण्यात आली आहे . कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांनी अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला आहे.

### हल्लेखोर फरार-पो.नि.गलांडे

आरोपींच्या मागावर आमची पथके पाठवण्यात आले असून हल्लेखोर सराईत असून पोलिसांना गुंगारा देण्यात ते यशस्वी झाले आहेत. काल संध्याकाळपर्यंत गुन्हेगारापर्यंत पोचण्यात पोलिसांना अपयश आले आहे.

## पिंपळसमधे नरभक्षक बिबट्या जेरबंद करण्यात यश



**शिर्डी :** राहाता तालुक्यातील पिंपळस परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून धुमाकूळ घालणाऱ्या बिबट्यांपैकी एकाला जेरबंद करण्यात वनविभागाला यश आले आहे. शनिवारी सायंकाळी आग्रे-निधाने वस्ती भागात लावलेल्या पिंजऱ्यात, भक्ष्याच्या शोधात आलेला बिबट्या कोंबड्याच्या आकर्षणाने अलगद अडकला. या कारवाईमुळे स्थानिक रहिवाशांनी सुटकेचा निःश्वास सोडला असला, तरी परिसरात अजूनही इतर बिबट्यांचा वावर असल्याने भीतीचे वातावरण कायम आहे.

पिंपळस शिवारातील गट नंबर १४४ आणि परिसरातील आग्रे-निधाने वस्तीवर गेल्या काही दिवसांपासून बिबट्यांचे कुटुंब वास्तव्यास आहे. या बिबट्यांनी अनेक पाळीव कुत्रे, शेळ्या आणि कालवडी फस्त केल्या होत्या. बिबट्यांच्या दहशतीमुळे रात्री शेतात पाणी भरण्यासाठी जाण्यास कोणीही धजावत नव्हते. दिवसा ढवळ्या होणाऱ्या दर्शनामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण होते. सध्या साखर कारखान्यांनी ऊस तोडून नेल्यामुळे बिबट्यांचे नैसर्गिक लपण नष्ट झाले आहे. सुरक्षित जागेच्या शोधात हे बिबट्ये आता थेट शेतातील वस्त्यांकडे वळू लागले आहेत. रहिवाशांच्या वाढत्या तक्रारीची दखल घेत वनविभागाने तीन दिवसांपूर्वी या भागात पिंजरा लावला होता. त्यात भक्ष म्हणून ठेवलेल्या कोंबड्याच्या नादात हा बिबट्या जेरबंद झाला. पिंजऱ्यात एक बिबट्या अडकला असला तरी, या भागात अजूनही नर-मादी आणि दोन बछड्यांचा वावर आहे.